किंमत : १० रुपये

सप्टेंबर २००९

# राष्ट्रवादी

स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!




- उत्पादन घटीने साखर वाढली
- वाजवी किमतीत साखर पुरवठा
- स्वायत्तता सहकारी संस्थांना
- नारळ उत्पादनासाठी खास योजना
- एकजुटीनेच दुष्काळावर मात
- कसोटी प्रशासन कौशल्याची

संपादकीय

**राष्ट्रवादी निष्ठावंतांची कसोटी**

| | | |
|---|---|---|
| स्वच्छतेचे काटेवाडी प्रारूप | यशस्विनी अभियान | जसवंतांना भोवले जीना |
| निळवंडे कालवा भूमीपूजन | भाजपपुढे धर्मसंकट | बांधकाम भवन उद्घाटन |

# अनुक्रमणिका


■ राष्ट्रवादी निष्ठावंतांची कसोटी — संपादकीय — २

■ श्री. शरद पवार यांची भाषणे



१) एकजुटीनेच दुष्काळावर मात शक्य — ६
२) आता कसोटी प्रशासन कौशल्याची — १२
३) अन्नसुरक्षा कायद्याच्या अंमलबजावणीस केंद्र सरकार वचनबद्ध — १८
४) स्वायत्ततेखेरीज सहकारी संस्थांची कार्यक्षमता वाढणे अशक्य — २६
५) नारळ उत्पादनास चालनेसाठी केंद्राची खास योजना — ३०
६) वाजवी किमतीत पुरेसा साखर पुरवठा करण्यास सरकार वचनबद्ध — ३४



■ निळवंडे धरण पूर्णत्वाला नेऊ — अजित पवार — ३८

■ यशस्विनी अभियान — विश्वास ठाकूर — ५०

■ अल्पसंख्यांकांना राष्ट्रवादीच न्याय देईल — आर. आर. पाटील — ५६

■ भाजपापुढे नेतृत्वाचे ‘धर्मसंकट’ अन् विरोधकांचे तीन तेरा — विजय नाईक — ६२

■ जसवंतांना भोवले जीना! अंतर्गत सत्तास्पर्धा व दुहीचे भाजपला ग्रहण — डॉ. सुधीर भोंगळे — ७१

■ बीओटीतून २१ हजार कोटींची बांधकामे — छगन भुजबळ — ७६

■ ग्रामस्वच्छतेचे काटेवाडी प्रारूप — शब्दांकन : डॉ. सुधीर भोंगळे — ८०

■ इंग्लंडने ॲशेस जिंकले — मुकुन्द मोघे — ८७



प्रबंध संपादक
**आर. आर. पाटील**
वर्ष पहिले
अंक : **चौदावा**
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक व प्रबंध संपादक सहमत असतीलच असे नाही.

संपादक :
**डॉ. सुधीर भोंगळे**

संपादकीय पत्रव्यवहार
राष्ट्रवादी भवन, शासकीय कुटीर क्र. २१, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई - ४०० ०२१
दूरध्वनी : ३०२३५५१८/५५/५६

व्यवस्थापकीय संचालक
**हेमंत टकले**
संकलन सहभाग :
**बाळासाहेब लासुरे**
वितरण व्यवस्था :
**डॉ. गजानन देसाई**
निर्मिती व्यवस्था :
**जितेंद्र गोस्वामी**
मुखपृष्ठ रचना :
**दिलीप रोडे, पुणे**

**वर्गणीचे दर :**
**वार्षिक रु. २००/-**
**आजीव रु. २०००/-**
(दिवाळी अंकासह)

हे मासिक
www.mhncp.org
यावर उपलब्ध आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकरिता मुद्रक, प्रकाशक श्री. आर. आर. पाटील यांनी मयुर प्रिंटर्स, ५०६/मयुरेश, दत्ताराम लाड मार्ग, काळाचौकी, मुंबई -३३ येथे छापून राष्ट्रवादी भवन, शासकीय कुटीर क्र. २१, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई - २१, येथून प्रकाशित केले.

## संपादकीय



# राष्ट्रवादी निष्ठावंतांची कसोटी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना होऊन आता १० वर्षे पूर्ण झाली आहेत. पक्षाचे संस्थापक अध्यक्ष श्री. शरद पवार यांच्या तात्त्विक बैठकीचे व प्रचंड अनुभवाचे अधिष्ठान पक्ष स्थापनेच्या पाठिशी उभे आहे. त्यामुळे सुरूवातीपासूनच पक्ष मजबुतीने उभा राहून सत्तेत विराजमान झालेला आहे. सत्तेची फळे ज्यांनी चाखली त्यांना ती गोड लागल्यामुळे त्यात आणखीन गोडी वाटणे साहजिक आहे. जे सत्तेपासून दूर राहिले, फळं लांबूनच बघावी लागली त्यांच्यादृष्टीने ती आंबट आहे, पण तरी म्हणून मिळविण्याची आशा आहेच. ऐनकेन प्रकाराने ती अंकित करण्यासाठी सगळा आटापीटा, खटाटोप चालू आहे. श्री. शरद पवार यांच्यामुळे राष्ट्रवादीला सत्ता मिळते या सत्याची जाणीव असल्यामुळे खोटेनाटे आरोप करून, सातत्याने लक्ष्यपूर्वक टीकेची झोड उठवून हा झराच प्रदूषित व बदनाम करायचा असा प्रयत्न विरोधक सातत्याने करीत आले आहेत.

लोक येतील आणि जातील पण मी सतत प्रवाही राहीन या तत्वज्ञानाने भारलेले पवार हा एक वाहता झरा आहे. तो झरा काय आहे, कशाचे प्रतिक आहे हे आपण कार्यकर्त्यांनी नीट समजून घेतले पाहिजे. हा झरा लोकहित साधकाच्या सतत गतिमान जीवनाचा आणि कर्मकठोर साधनेचा एक मूर्तिमंत संकेत आहे. तो कशानेच बाधित होत नसल्यामुळे त्यांना सातत्याने प्रतिपक्षीय मानून आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा प्रयत्न केला जातो आहे. लोकांना पवार नकोसे वाटावेत अशी भावना वा हवा तयार केली की आपोआपच राष्ट्रवादी दुबळी होईल या पोकळ आशावादावरती कुभांडे रचण्याचा आणि त्यांच्या कामातील व निर्णयातील वैगुण्ये शोधण्याचा खटाटोप चालू आहे. पण जनमानसाला पवारांची क्षमता, उपयुक्तता व उपयोगिता माहित असल्यामुळे जनतेला ते प्रतीपक्षी न वाटता सातत्याने हवेहवेसेच वाटणार ही काळ्या दगडावरची रेघ आहे.

महात्मा गांधींनी १९२१ साली ब्रिटिशांच्या विरुद्ध जेव्हा चळवळ सुरू केली तेव्हा लॉर्ड रीडिंगने तिची टिंगल ''द मोस्ट फूलिश ऑफ ऑल फूलिश स्कीम्स्'' (जगामध्ये जेवढ्या मूर्खपणाच्या योजना आत्तापर्यंत झाल्या असतील त्या सगळ्यात मूर्खपणाची योजना) अशा शब्दांत करून गांधींच्या चळवळीला टोला हाणला होता. नंतर मात्र त्याच लॉर्ड रीडिंगला चळवळीला विरोध करावा लागला. 'आम्ही पकडू, आम्ही दडपून टाकू,' असे तो म्हणू लागला. त्यावर गांधींनी लिहिले, 'फ्रॉम रिडिक्युल टू ऑपोझिशन ! आता तो टिंगल नाही करू शकत चळवळीची, त्याला विरोध करावा लागेल.' राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रवास पवार व त्यांच्या सहकाऱ्यांमुळे आता या टप्प्यापर्यंत आला आहे म्हणून इतरांना तो प्रतिपक्षीय वाटतो आहे.

स्वतःच्या गोटातला प्रतिपक्षीय निराळा, तो प्रतिपक्षीय म्हणजे दावेदार. ज्याचा आपल्यासारखाच हक्क असेल त्याला

दावेदार असे नाव आहे. पक्ष वाढविण्यासाठी आणि पवारांचे बाहू बळकट करण्यासाठी ज्यांनी ज्यांनी म्हणून श्रम केले, खस्ता खाल्ल्या असतील ते ते सर्व निवडणुकीसाठी उमेदवारीचे दावेदार ठरतात, ठरू शकतात पण निवडून द्यायच्या जागा मर्यादित व मोजक्याच असल्यामुळे दावेदारातला सर्वात पात्र व गुणवान आणि लोकांना जो हवाहवासा वाटतो त्याच्या पदरात उमेदवारीची भिक्षा पडली तर मात्र इतरांनी त्याबद्दल दुःख, द्वेष, वैर, कटुता, प्रतिस्पर्धी अशा प्रकारच्या भावना मनात न बाळगता विजयासाठी त्याच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहणे हे आद्य कर्तव्य ठरते. उमेदवारी मिळविण्यासाठी प्रयत्न करणे चुकीचे नाही. पण ती मिळाली नाही म्हणून मी बंडखोरी करीन, दुसऱ्या पक्षात जाईन, विरोधात काम करीन किंवा छुपेपणाने पाठीत खंजीर खुपशीन हे निष्ठावंत लोकसेवकाच्या भूमिकेत व तत्त्वात बसत नाही.

निवडून आलो, आमदार झालो तरच जनतेची सेवा करता येते हे खरे नाही. पक्षातही सेवेचे कितीतरी मार्ग उपलब्ध आहेत. हजारो कार्यकर्त्यांना सत्ता, पदे मिळाली नसतील म्हणून त्यांचे काम आणि त्यांचे महत्व काही कमी मोलाचे ठरत नाही. उलट त्या कार्यकर्त्यांच्या ताकदीवरच पक्षाच्या किर्तीचा सुगंध अवलंबून असतो. स्थानिक कार्यकर्त्यांच्या शक्तीतून आणि विश्वासातून कार्य झाले तर त्यात प्रचंड गोडी असते आणि तेच टिकावू असते याचा अनुभव आपण सर्वांनी अनेकदा घेतलेला आहे. चांगल्या कार्याचा सुगंध वातावरणात पसरतो. तो सुगंध आणि असे कार्य करणारा कार्यकर्ता माणसाला आकर्षित करतो. लोकांना तो हवाहवासा वाटतो. चांगल्या कृतीबद्दल माणसाच्या मनात अनुराग निर्माण होतो. हा अनुराग म्हणजेच कीर्ति. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने गेल्या दहा वर्षात काँग्रेस बरोबर सत्तेत राहून विकास कामांचा जो प्रचंड उंच असा ध्वज उभारला आहे त्याची फळे समाजाला आता वेगवेगळ्या क्षेत्रात अनुभवाला येत आहेत. ही कृती आणि हा अनुभव आपली राष्ट्रवादीची कीर्ति पुढे पसरवित नेणार आहे. ती कीर्ति पुढे अशा प्रकारच्या चांगल्या कृतींना प्रेरणा देते. म्हणून अशा कृतीची परंपरा चालविणारी जी शक्ति आहे तिला निष्ठा म्हणतात.

मूळ मुद्दा असा आहे की लोकशाहीमध्ये तळागाळातल्या लोकांची सुखदुःखे नीट जाणून, त्यांच्या बरोबर राहून, त्यांची कामे प्रत्यक्षात स्वतः झीज सोसून साध्य करीत करीत नेतृत्व निर्माण होते व फुलत जाते. संसदीय लोकशाही प्रक्रियेत अशा प्रकारे जनसेवेच्या कार्यात तावून सुलाखून निघालेले व लोकाधाराला प्राप्त झालेले नेते साहजिकच वेगवेगळ्या पातळीवर लोकप्रतिनिधीत्व संपादन करून शासन संस्थेमार्फतही लोकांचे प्रश्न सोडविण्याचा प्राधान्याने जाणिवपूर्वक प्रयत्न करतात. या प्रक्रियेत साहजिकच लोकहित आणि स्वतःला मिळणारे लौकिक यश यांची गुंफण घातली जाते. म्हणून आमदार, खासदारकीची आकांक्षा बाळगण्यात गैर काहीच नाही त्यामुळे तर कार्यकर्ते अधिकाधिक जोमाने काम करीत असतात.

पण याच संदर्भात एक कळीचा मुद्दा कोणालाच विसरून चालता येणार नाही तो असा की शासन संस्थेमार्फत आणि विविध प्रशासकीय यंत्रणांच्या माध्यमातून लोकांचे हित साधायचे असेल तर आधुनिक काळात संसदीय लोकशाही प्रक्रियेत पक्षनिष्ठ राजकारणाला पर्याय नाही. लोकशाहीमध्ये विविध पक्ष, त्यांना त्यांना रुचणाऱ्या मूल्यात्मक व तात्त्विक चौकटीत समाजातील विविध स्तरांच्या प्रसंगी एकमेकांना छेदणाऱ्या हितसंबंधांची व मागण्यांची गुंफण तयार करतात. त्या दिशेने स्वतःच्या पक्षाची संघटना उभारतात, पक्षाच्या ध्येयधोरणांशी निष्ठा असणारे दमदार कार्यकर्ते निर्माण करतात आणि जनतेपुढे आपापले धोरण आणि कार्यक्रम ठेवून पुढे जातात. कोणतीही जिवंत लोकशाही आजच्या काळात पक्ष पद्धतींशिवाय पुढे जाऊच शकणार नाही.

अशा वेळी एखादी असामी एकांडा शिलेदार म्हणून स्वतंत्र उमेदवार म्हणून निवडून येऊही शकतो. एखाद्या मतदारसंघात या ना त्या कारणाने कोणत्याही पक्षाला जनतेला जवळचा वाटणारा उमेदवार उभा करता आला नाही तर असे एकांडे शिलेदार निवडूनही येऊ शकतात. याचा अनुभव आपल्या देशातील पहिल्या सार्वत्रिक निवडणुकांपासून अगदी गेल्या लोकसभा निवडणुकीपर्यंत सर्वांनीच घेतलेला आहे. पण अधिक विचार केला तर चित्र असेच दिसते की असे उमेदवार कालांतराने राजकारणातून अस्तंगत तरी होतात किंवा त्यांना कुठल्यातरी उपलब्ध बळकट पक्षात शरणागताची भूमिका घेऊन सामील व्हावे लागते. ही गोष्ट येथे नमूद करण्याचे कारण असे की आपल्याला पक्षाची उमेदवारी मिळाली नाही तर अनेक भल्याभल्या कार्यकर्त्यांना सुद्धा बंडाचा झेंडा उभारून स्वतंत्रपणे निवडणूक लढविण्याचा मोह पडतो. असल्या विपरीत व कामचलावू खुमखुमीला ते स्वतंत्र बाणा म्हणतात. पण प्रत्यक्षात

आजवरच्या लोकशाहीचा आपला इतिहास हेच सांगतो की त्यामुळे ते जे पक्षाचे तात्कालिक नुकसान करतात त्यापेक्षा स्वतःच्या पायावरच कायमचा घाव घालून घेतात. ते एक गोष्ट विसरतात की यापुढच्या काळात लोकसेवा म्हणा किंवा स्वतःचे निव्वळ राजकीय करियर म्हणा पक्ष संघटनेशी बांधिलकी असल्याशिवाय दुसरा कोणताही राजमार्ग कोणालाही उपलब्ध नाही.

त्यामुळेच समजा जरी एखाद्या विशिष्ट निवडणुकीत पक्षश्रेष्ठींना एखाद्याला अपेक्षित उमेदवारी नाकारावी लागली तरी त्या कार्यकर्त्याने नेतृत्वावरचा विश्वास कायम राखत व पक्षाशी इमानदारी सांभाळत काम केले तर ती गोष्ट वरिष्ठांच्या जरूर लक्षात येते व अशा पक्षनिष्ठ कार्यकर्त्याचा कायमचा हिरमोड होणार नाही अशी दक्षता घेत राहते. ही गोष्ट जर लक्षात आली तर उद्याच्या विधानसभा निवडणुकीत उमेदवारी मिळण्याच्या बाबतीत राष्ट्रवादी पक्षाचे सर्वोच्च जाणते व कर्तृत्ववान नेतृत्व जो निर्णय देतील त्याचा स्वीकार प्रत्येकाने विवेकशीलता राखून मोठ्या उमेदीने केला पाहिजे. त्यातच सर्वांचे हित आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बाबतीत तर ही गोष्ट विशेष करून अगत्याची ठरते. श्री. यशवंतराव चव्हाण, श्री. वसंतदादा पाटील इत्यादी मातब्बर आणि सदैव लोकांची साथ मिळविलेल्या नेतृत्वाच्या मुशीत श्री. शरद पवार यांचे कर्तृत्व घडत आले आहे. उपरोक्त नेत्यांप्रमाणेच त्यांचा लोकसंग्रह दांडगा आहे. असा लोकसंग्रह त्यांनी निव्वळ भपकेबाज प्रचाराच्या गदारोळातून किंवा नाटकीपणे किंवा निव्वळ पोकळ गाजावाजा करीत खोटी आश्वासने देत साधलेला नाही तर गावोगावीच्या लोकांचे आणि त्यांच्यात काम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याचे मनोगत, कर्तृत्व, सुख-दुःखे, अडीअडचणी या गोष्टींची सतत जाण बाळगत श्री. शरद पवार यांनी महाराष्ट्रातले आपले अद्वितीय असे राजकीय व सामाजिक स्थान कमाविलेले आहे. कार्यकर्त्यांना वापरून नंतर त्यांना वाऱ्यावर सोडण्याची त्यांची रीत नाही तर उलट प्रत्येक कार्यकर्त्याला विकासाच्या वाटा अधिकाधिक मिळवून देऊन असे नेतृत्व सदोदीत फुलत ठेवण्याची त्यांची हातोटी सर्वजण जाणतात. म्हणून तर स्वतःचा राष्ट्रवादी पक्ष तर सोडाच पण त्याच्या जोडीला विविध क्षेत्रातील कसदार असे सहकारी क्षेत्रातले नेतृत्व त्यांनी सर्व महाराष्ट्रात पुढे आणले आहे. त्यामुळे असा नेता व असे नेतृत्व निव्वळ व्यक्तिगत कारणांकरिता किंवा लहरींपायी कोणाला अधिक जवळ करेल आणि कोणाला बाजूला टाकेल अशी वस्तुस्थिती उद्‌भवू शकत नाही. त्या त्या वेळी सामान्य जनतेला, गोरगरिबांना, देशाला व महाराष्ट्राला प्रसंग लक्षात ठेवून ज्या नेतृत्वाची गरज असेल तसेच नेतृत्व श्री. शरद पवार त्या त्या वेळेला पुढे आणतात. त्या त्या वेळी योग्य वाटणाऱ्या कार्यकर्त्याला उमेदवार म्हणून पसंती देतात. पण याचा अर्थ असा नसतो की तो असा अमरपट्टा कोणालाच ते बहाल करीत नाहीत किंवा ज्यांना प्रस्तुत संदर्भात उमेदवारी नाकारतात त्यांना पुढच्या वेळेला वाव देत नाहीत.

निवडणुकीतील उमेदवाराची निवड ही स्थलकाल संदर्भात ठरते. त्यात वैयक्तिक आवडीनिवडीची बाब गौण असते. ज्याला ज्याला त्या त्या परिस्थितीत आपापल्या मतदारसंघात पक्षाकरिता विजयश्री खेचून आणता येईल अशाच कार्यकर्त्याला त्या त्या वेळी वाव मिळतो ही गोष्ट लक्षात घेतली तर आम्ही सुरुवातीलाच म्हटल्याप्रमाणे येत्या विधानसभा निवडणुकीत निवडणूक मोहिमेच्या सर्वच्या सर्व प्रक्रिया व टप्प्यांमध्ये कार्यकर्त्यांची कसोटी लागणार आहे. त्यांच्या त्याच्या डावपेचांचा भाग म्हणून सारे विरोधी पक्ष श्री. शरद पवार आणि राष्ट्रवादीचे बाकी सर्व पातळीवरचे नेतृत्व यांच्यामध्ये दुही माजविण्याची खेळी खेळत आहेत. अर्थातच त्यांचे हे दिवास्वप्न महाराष्ट्रातील एकूण जनता व मतदार ठोकरून लावणार आहेत हे निश्चित. पण विरोधी पक्षांच्या धुळवडीमुळे काही वेळा कार्यकर्त्यांनाही स्वतःचा बुद्धिभेद होईल, असा प्रचारही क्वचित मोहक वाटू लागेल. अशा वेळी श्री. शरद पवार यांना साथ देत देतच पक्षाला व स्वतःला यश मिळणार आहे हे सर्वच कार्यकर्त्यांनी लक्षात ठेवलेले बरे.

आम्ही या निमित्ताने आणखीन एक गोष्ट आवर्जून नमूद करू इच्छितो. आम्ही या ठिकाणी जी शरद पवार यांची प्रशंसा किंवा भलावण करीत आहोत ती व्यक्तीपूजा म्हणून नव्हे. श्री. शरद पवार यांचे आम्हाला स्तोम माजवायचे आहे असेही नव्हे. एक तर व्यक्तिशः श्री. शरद पवार यांना पहिल्यापासून असल्या गोष्टी कधीही रुचल्या नाहीत. सार्वजनिक जीवनात आजवर ते व्यक्तीनिरपेक्ष भूमिकेतूनच वावरले आहेत. त्यांचे स्वतःचे कार्य इतके अस्सल आहे की त्या करिता स्वतःची आरती ओवाळून घेण्याचे त्यांना कारणच नाही. मुद्द्याची गोष्ट अशी आहे की राष्ट्रवादी पक्ष हा निव्वळ एकाच

व्यक्तिभोवती किंवा काही मूठभर नेत्यांभोवती गुंफलेला मेळा नाही तर उलट काही निश्चित मूल्यांवर, काही समान तत्त्वांवर, काही समान हितसंबंधांवर लोकहिताकरिता उभा राहिलेला व्यक्तिनिरपेक्षपणे काम करणारा असा तो कार्यकर्त्यांचा शिस्तबद्ध संच आहे. महाराष्ट्रातील सत्यशोधक परंपरा आणि बहुजनवादी राजकीय परंपरा याच रितीने घडत आलेली आहे. सर्वांना बरोबरीने घेऊन जाण्याचे धोरण श्री. यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या शुभप्रसंगी अंगिकारले होते आणि म्हणूनच गेल्या ५० वर्षांच्या महाराष्ट्रातील लोकशाही जडणघडणीचे आद्य शिल्पकार म्हणून आज विरोधकांसह सर्वच जण त्यांना ओळखतात. राष्ट्रवादी पक्षही असाच सर्वांना भेदभाव न करता पुढे घेऊन जाणारा पक्ष आहे.तो गोरगरिबांचे हित सर्वात महत्त्वाचे मानतो पण त्याच जोडीला जे लोकहिताला बाधक गोष्टी करीत नाहीत अशा धनवंतांनाही तो आपला वैरी मानत नाही. राष्ट्रवादी पक्ष म. फुले यांची परंपरा मानतो. म्हणून तर तो म. फुल्यांच्या शब्दांत शूद्र अतीशूद्र स्त्रीया आणि आजच्या सार्वजनिक परिभाषेत दलित, आदिवासी, भटके विमुक्त, इतर मागासवर्गीय, अल्पसंख्यांक यांना प्राधान्य देतो पण त्याच वेळी मराठा व ब्राह्मण समाजातील बहुसंख्य जनतेच्या भावनांचाही आदर करतो. राष्ट्रवादी पक्षाचे लक्ष्य नेहमी आकाशात उंच झेपावलेल्या घारीप्रमाणे ग्रामीण भागावर म्हणजे खेड्यापाड्यांवर असते. तरी पण त्यांना शहराशहरांमध्ये सर्वसामान्यांचीही कदर करावीशी वाटते. किंबहुना ग्रामीण किंवा नागरी असा भेदभाव फार न ताणता ज्याच्यामुळे अधिकाधिक संपत्ती निर्माण होईल, सर्वांना विकासाची फळे चाखायला मिळतील, सर्वांनाच आधीच्या मानाने चांगले जीवनमान मिळविता येईल याकरिता सामाजिक बेबनाव न करता सर्वांना एकत्रित बांधून पुढे जाण्याची रीत हीच राष्ट्रवादी पक्षाची खरी रीत आहे.

त्यात सर्वांनाच वाव आहे. पण आहे तो फक्त स्वतःची तुंबडी भरणाऱ्यांकरिता नव्हे तर ज्यांना ज्यांना सर्वांना बरोबरीने घेत घेत लोकांचे गरजेचे व तातडीचे प्रश्न सोडविण्याची आस आहे त्यांच्या करिताच. उद्याच्या विधानसभा निवडणुकीत तर या गोष्टीला फार महत्त्व येणार आहे. आपल्या हातातून सत्ता निसटल्याने भाजप-शिवसेना आणि तत्सम असे उजवे, प्रतिगामी धर्मांध किंवा एकांडे राजकारण करणारे पक्ष व गट हाताश झाले आहेत आणि म्हणून ते आकाशपाताळ एक करून हव्या त्या आरोपांचा मारा लोकशाहीवादी, सेक्युलर आणि जनतानिष्ठ पक्षांवर व कार्यकर्त्यांवर करीत आहेत. मागच्या निवडणुकीत लोकांनी फार मोठ्या विवेकाने सर्व देशाला पुढे नेणाऱ्या नेतृत्वाला राष्ट्रीय पातळीवर कौल दिलेला आहे. पण अशा कौलाचे रहस्य नीट न कळल्यामुळे काही एरव्ही सेक्युलर असलेल्या मंडळींनाही स्वतःच्या अतिरिक्त गर्वाची बाधा झालेली दिसते. अशीही मंडळी या धर्मांध व प्रतिगामी पक्षांना त्यांच्या या भूमिकेमुळे अप्रत्यक्ष साथ देत आहेत. पण सुदैवाची गोष्ट अशी आहे की सर्वोच्च पातळीवरील राष्ट्रीय काँग्रेसचे नेतृत्व म्हणजे श्रीमती सोनिया गांधी, श्री. राहुल गांधी आणि त्यांचे सहकारी व केंद्र शासनाचे सर्वोच्च नेते पंतप्रधान श्री. मनमोहनसिंग व त्यांचे सहकारी यांना वास्तवाची चांगली जाण आहे. त्यामुळे महाराष्ट्र विधानसभेच्या येत्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला टाळून एकतर्फी यश संपादन करण्याचा विचारही त्यांना भ्रामक वाटत आहे. तेव्हा अशा परिस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातल्या कार्यकर्त्यांनी तर आपल्यावर पडलेल्या विशेष जबाबदारीचे भान राखीत काम करणे महत्त्वाचे आहे.

थोडक्यात, वेळ बंडखोरीची नाही तर एकसाथ लढण्याची आहे. वेळ एकमेकांचे उणेदुणे काढण्याची नाही तर सर्वांनाच यश लाभेल अशा रीतीने कर्तृत्व दाखविण्याची आहे. वेळ त्रागा करण्याची नाही तर उलट आपली सर्व शक्ती पणाला लावून विजयश्री खेचून आणण्याची आहे. खरे तर महाराष्ट्रातील बहुसंख्य मतदार आपल्यालाच मानतात. त्यांना आपणच हवे आहोत. सवाल व कसोटी त्यांच्या विश्वासाची नाही तर आपणच एकमेकांचा विश्वास राखत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला आपली संपूर्ण निष्ठा वाहणारआहोत की नाही याची आहे. ही निष्ठा अभंग राहिली तर श्री. शरद पवार यांचे संवेदनक्षम नेतृत्व मानणारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षच आगामी काळात सत्तेचे सिंहासन लोकहिताकरिता ताब्यात घेईल हे निश्चित आहे.





# एकजुटीनेच दुष्काळावर मात शक्य...

**– शरद पवार**

''मोसमी पावसाच्या उशीरा व अल्प वृष्टीमुळे देशातील किमान दहा राज्यांत दुष्काळी स्थिती निर्माण झाली आहे. त्यावर मात करून कृषी उत्पादनवाढीचा वेग टिकवायचा आणि गोरगरीब शेतकरीवर्गास मदतीचा हात द्यायचा तर केंद्र व राज्य सरकारांनी एकजुटीने कामास लागले पाहिजे. नियोजनबद्ध कार्यक्रम आखून त्यांची तातडीने अंमलबजावणी केली पाहिजे...''

२१ ऑगस्ट, २००९ रोजी दिल्लीत सर्व राज्यांच्या कृषीमंत्र्यांची खास बैठक झाली. त्यात केंद्रीय कृषीमंत्री श्री. शरद पवार यांनी केलेले हे भाषण.

माझे मंत्रिमंडळातील सहकारी आदरणीय अर्थमंत्री श्री. प्रणव मुखर्जी, ग्रामीण विकासमंत्री डॉ. सी.पी. जोशी, राज्यमंत्री प्रा. थॉमस, सर्व राज्यांचे सन्मान्य कृषीमंत्री, वरिष्ठ अधिकारीवर्ग आणि उपस्थित स्त्री-पुरुषहो, उशिरा अपुऱ्या व अनियमित मोसमी पावसामुळे देशाच्या विविध भागात निर्माण झालेल्या परिस्थितीचा विचार करण्यासाठी आयोजित या महत्त्वपूर्ण बैठकीस मी आपणा सर्वांचे स्वागत करतो. सध्याच्या एकूण स्थितीचा आढावा तसेच आपल्या कृषीक्षेत्रापुढे निर्माण झालेल्या समस्यांवर मात करण्यासाठी आज आवश्यक असलेल्या उपाययोजनांचा तपशील कृषी सचिवांनी याआधीच दिलेला आहे.

मान्सूनचा निम्मा हंगाम संपत आला असला तरी अद्याप देशभरात समाधानकारक पाऊस झालेला नाही, हे आपण सर्वचजण जाणतो. काही राज्यात तर फारच तुरळक पर्जन्यवृष्टी झालेली असून ती सरासरीपेक्षा ४० टक्क्यांहून कमी आहे. त्यामुळे दहा राज्यांमधील २४६ जिल्ह्यांत दुष्काळ जाहीर झालेला असून, केवळ पिकांच्याच दृष्टीने नव्हे तर पशुधनाचे आरोग्य रक्षण, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा आणि मुख्यतः छोटे दुर्बल शेतकरी व भूमीहीन मजुरांची उपजिविका या दृष्टीनेही ही स्थिती अतिशय गंभीर आहे. त्यावर मात करायची आणि पाणीटंचाईच्या या काळात उभ्या पिकांचे रक्षण करायचे तर सद्यःस्थितीचे अचूक मुल्यमापन होण्याची गरज आहे. हे झाले तरच पेरणी न झालेल्या क्षेत्रात पर्यायी पिके घेणे, दुष्काळी कामे सुरू करणे, दुष्काळग्रस्त नागरिकांना अन्नधान्य-चारा-पिण्याचे पाणी व रोजगार पुरविणे आणि रब्बी, हिवाळी व उन्हाळी पिकांचे नियोजन करणे यासाठी नेमकी काय पावले उचलायची याचा योग्य निर्णय आपण करू शकू.

१९ तारखेस माझी राज्यांच्या अन्नमंत्र्यांबरोबर एक बैठक झाली आणि मला सांगायला समाधान वाटते की गेल्या वर्षी विक्रमी धान्यखरेदी झाल्यामुळे सर्व ठिकाणच्या सरकारी गोदामांमध्ये आज अगदी पुरेसा धान्यसाठा आहे. गतवर्षी आपल्याकडे एकूणच विक्रमी धान्योत्पादन झाले. त्यात तांदूळ उत्पादनाचा वाटा १०० दशलक्ष टन तर गव्हाचा वाटा ८१ दशलक्ष टन एवढा होता. आता अपुऱ्या पावसामुळे कठीण परिस्थिती निर्माण झालेली असली तरी सर्व नागरिकांना पुरेसे अन्नधान्य उपलब्ध करून देण्यासाठी आपापले खाते पूर्ण पणे सज्ज असल्याची ग्वाही सर्व अन्नमंत्र्यांनी मला दिली आहे. या अडचणीच्या काळात जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढू नयेत



यासाठी आवश्यक ते सर्व उपायही योजले जाणार आहेत. अर्थात हे सारे साध्य करायचे तर यापुढील काळात आपले अन्नधान्य उत्पादन अधिक मोठ्या प्रमाणात वाढणे गरजेचे असून त्यात तुमची भूमिका फार महत्त्वाची राहील.

सध्या सुरू असलेल्या खरीप हंगामातील पीक स्थितीवर आम्ही बारकाईने लक्ष ठेवून आहोत. गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा तांदुळाची लागवड सुमारे ५७ लाख हेक्टर कमी क्षेत्रावर होण्याची शक्यता आहे. हा आकडा एकूण लागवडक्षेत्राच्या १५ टक्के एवढा आहे. हीच गोष्ट तेलबिया व उसासारख्या पिकांच्या बाबतीतही घडताना दिसते. ऐन हंगामात पाऊस कमी झाला तर या पिकांचे आरोग्य तर धोक्यात येईलच पण पर्यायाने त्यांच्या उत्पादनावरही विपरीत परिणाम होईल.

ही सारी पार्श्वभूमी लक्षात घेऊन आता उभ्या पिकांच्या रक्षणासाठी आपल्याला उपलब्ध असलेल्या कोणत्याही जलस्रोतातून शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करून द्यावे लागणार आहे. दरम्यान, हे पाणी मिळविताना शेतकऱ्यांवर जादा खर्चाचा बोजा पडू नये म्हणून आम्ही यापूर्वीच डिझेलवर सबसिडी जाहीर केलेली आहे. तसेच पंजाब-हरियाना-राजस्थान-उत्तर प्रदेश व बिहारमधील शेतकऱ्यांना केंद्रीय राखीव साठ्यातील जादा वीजही उपलब्ध करून दिली आहे. आमच्या या सर्व उपाययोजनांची आपल्याला पूर्ण कल्पना असल्याने त्याचे लाभ शेतकरी वर्गापर्यंत पोचविण्यासाठी आपणही आवश्यक ती सर्व पावले उचलत आहात याची मला खात्री आहे.

प्रतिकूल हवामानामुळे ज्या क्षेत्रात तांदुळाची लागवड होऊ शकलेली नाही तिथे आता डाळी, सूर्यफूल, बाजरी वा गवत आणि भाज्या यासारखी पर्यायी पिके घेण्यास प्रोत्साहन देण्याची तातडीने आवश्यकता आहे. या सर्व पर्यायी पिकांसाठी आवश्यक असलेले जादा बी-बियाणे देशात पूर्णपणाने उपलब्ध असल्याचे मला सांगण्यात आले आहे. आता हे बी-बियाणे व अन्य सर्व गोष्टी शेतकऱ्यांपर्यंत विनाविलंब पोचविण्यासाठी राज्यांच्या कृषी खात्यांकडून आवश्यक ती व्यवस्था होईल, अशी माझी अपेक्षा आहे. बी-बियाणाच्या विषयाशी संबंधित अनेक निकष-निर्बंध आम्ही यापूर्वीच शिथिल केले असून, सार्वजनिक-खासगी कंपन्या वा विद्यापीठांकडून तयार होणाऱ्या बियाणांच्या वापरासही प्रोत्साहन दिले जात आहे. आता रब्बी व उन्हाळी हंगामाची पूर्वतयारी म्हणून आवश्यकता असेल त्या राज्यांनीही भरपाई बियाणे उत्पादन कार्यक्रम हाती घ्यावेत, असे आवाहन मी येथे करू इच्छितो. या कामात त्यांना संपूर्ण सहकार्य करण्याचे आदेश एनएससी व नाफेडसारख्या केंद्रीय संस्थांना देण्यात आले आहेत.

पर्यायी पीक-विकास कार्यक्रमांना गती देण्यासाठी सध्या चालू असलेल्या अन्य योजनांचा निधी वापरण्याची मोकळीकही


अपुऱ्या पावसामुळे भात लागवडी अडचणीत

सर्व राज्यांना देण्यात आली आहे.

आयसीएआरच्या वेबसाइटवरील हवामानावर आधारित कृषी विकास कार्यक्रमाची ताजी माहिती सध्या दररोज दिली जात असून, बदलत्या हवामानानुसार वेगवेगळी कृषीतंत्रे कोणी व कशी वापरावीत याची माहिती याद्वारे शेतकऱ्यांपर्यंत पोचविली जात आहे. हा कार्यक्रम देशभरच्या शेतकऱ्यांना समजावून सांगण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना आयसीएआरच्या संघटना-संशोधन संस्था-राज्यांची कृषी विद्यापीठे व कृषी विज्ञान केंद्रांना देण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांना योग्य सल्ला व मार्गदर्शन उपलब्ध व्हावे म्हणून आता राज्य सरकारांनीही आपल्या यंत्रणा कार्यान्वित कराव्यात असे माझे त्यांना आवाहन राहील.



अपुऱ्या पावसाने उसाच्या लागणीही मंदावल्या.

यंदा रब्बीच्या पिकांची लागवड लवकर व अधिक प्रमाणात होईल अशी अपेक्षा आहे. पूर्व उत्तर प्रदेश-बिहार व प. बंगालसारख्या राज्यांमध्ये गव्हाच्या पेरण्या वेळेवर होतील याची काळजी आता घेतली गेली पाहिजे. या पेरण्या १५ नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करणे शेतकऱ्यांना शक्य व्हावे म्हणून पूर्वेकडील राज्यांमध्ये जोरदार मोहीम हाती घेतली जाण्याची गरज आहे. गव्हाच्या वेळेवर पेरण्या झाल्या आणि त्यासाठी सरकारकडून शेतकऱ्यांना आवश्यक ते बियाणे-खते व पतपुरवठा केला गेला तर गव्हाचे उत्पादन निश्चितच वाढू शकेल आणि मग खरीपाच्या हंगामातील उत्पादन तूटही काही प्रमाणात भरून निघेल. छत्तीसगड, मध्यप्रदेश, झारखंड व ओरिसासारख्या राज्यांतील ज्या जमिनीत भाताची लागवड होऊ शकलेली नाही तिथे आता हरभरा, डाळी व मोहरीसारखी पिके घेण्यास चांगला वाव आहे.

साखर हा आपल्या चिंतेचा आणखी एक विषय आहे. सध्या उसाची लागवड व साखर उत्पादन यात सातत्याने घट होत चालल्याचे दिसते. परिणामी आता साखरेच्या किमती झपाट्याने वाढू लागल्या आहेत. त्या रोखण्यासाठी ऊस लागवडीचे क्षेत्र वाढविण्याकडे संबंधित राज्यांनी अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

शेतीउत्पादन वाढविण्यासाठी नेमकी कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे, हे लक्षात घेऊन त्या सर्व गोष्टी शेतकऱ्यांना वेळेत उपलब्ध होतील याची दक्षता घेतली गेली पाहिजे. याखेरीज आपल्या जलसाठ्यांचा यथायोग्य वापर करण्याकडेही आपण लक्ष देणे गरजेचे आहे. यंदा पाऊस कमी झालेला असला तरी केंद्रीय जल आयोगाच्या अखत्यारीतील सर्व प्रमुख जलाशयांमधील पाण्याचे साठे नेहमीच्या पातळीला (नॉर्मल लेव्हल) पोहोचत आहेत. स्पिंक्लर्स व ठिंबक सिंचनासारख्या गोष्टींना प्रोत्साहन देऊन आपण या उपलब्ध पाण्याचा वापर पूर्ण कार्यक्षमतेने करणे जरुरीचे आहे. त्यासाठी संबंधित सर्व यंत्रणांमध्ये आवश्यक ते सामंजस्य राखण्याची जबाबदारी तुम्ही पार पाडली पाहिजे.

रब्बी हंगामाचे नियोजन करण्यासाठी आमच्या बाजूने आम्ही रब्बी परिषद लगेच आयोजित करण्याची तयारी केली असून, त्यात होणाऱ्या सर्व निर्णयांची अंमलबजावणी विविध प्रशासकीय पातळ्यांवर त्वरित होण्याची खबरदारीही घेतली आहे.

गवत व चाऱ्याचा पुरवठा आणि पशुधनाच्या आरोग्याची काळजी हा सध्याच्या परिस्थितीचा एक फार महत्त्वाचा घटक आहे. या संकटाच्या कालात पशुधन टिकून राहाणे आपदग्रस्त शेतकऱ्यांच्या पुनर्वसनासाठी फार आवश्यक आहे. त्यामुळे जनावरांना पुरेसा चारा मिळावा व त्यांच्या स्वास्थ्य रक्षणाचीही योग्य काळजी घेतली जावी यासाठी सर्वतोपरी प्रयत्न झाले पाहिजेत.

आपल्या देशाच्या वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या प्रकारचे हवामान असते आणि त्यामुळे तेथे वेगवेगळ्या प्रकारची पिके




घेतली जातात. या स्थितीत पावसाअभावी एका भागातील पिकांचे काही नुकसान झाले तर ते भरून काढण्यास अन्य भागातील पिके सहाय्यक ठरू शकतात. हवामान व पिकांच्या या वैविध्याचा लाभ एकूण कृषीउत्पादन सर्वसामान्य स्वरुपाचे राहाण्यासाठी करून घेतला पाहिजे. त्या दृष्टीने एनआरईजीएस व आयडब्ल्यूडीपीसारख्या योजनांचे सहाय्य घेऊन शेतजमिनीची ओल टिकविता येऊ शकेल. राज्या-राज्यांमधील कृषीउत्पादन वाढविण्यासाठी कृषी खात्याने रेनवॉटर हार्वेस्टिंग व ग्राऊंड वॉटर रिचार्जिंग सारख्या योजना राबविण्याची हीच वेळ आहे. त्यामुळे कमीत कमी काळात आपल्या जलसंपत्तीचे रक्षण होण्यास हातभार लागेल.

देशाच्या पूर्व भागात भूमिगत जलसाठे मोठ्या प्रमाणात आहेत. ट्यूबवेल्स उभारून, विहिरी खणून वा शेतकऱ्यांच्या शेतांवर छोटे तलाव बांधून या जलसाठ्यांचा विकास करण्यास राज्यांनी सर्वाधिक प्राधान्य दिले पाहिजे. त्यासंबंधातील त्यांच्या प्रस्तावांना तातडीने मंजुरी दिली जाईल, असे आश्वासन नाबार्डच्या अध्यक्षांनी मला दिले आहे. या हंगामात तुरळक पाऊस झाला असतानाही आपल्या पेरण्या वेळेत आटोपून पंजाब व हरियानाच्या शेतकऱ्यांनी भूमिगत जलस्त्रोत विकासाचे महत्त्वच अधोरेखित केले आहे. त्यांचा लागवडखर्च वाढला असला तरी त्यांच्या हंगामाची उत्तम निश्चिती झाली आहे. अशा वाढीव खर्चाशी संबंधित प्रश्नावर तोड काढणे फारसे कठीण नाही. त्यामुळे या शेतकऱ्यांना भरपाई देण्याबाबत लौकरच काही निर्णय घेतला जाईल.

आज तुम्हाला येथे दिलेल्या विषय पत्रिकेत (अजेंडा) विभिन्न राज्यातील सध्याची पीकस्थिती आणि खरिपाप्रमाणे रब्बी हंगामासाठीच्या संभाव्य उपाययोजना यांची ठळक माहितीही जोडलेली आहे. त्यासंबंधातील विचार व प्रतिक्रियांना तुम्ही आपल्या भाषणात जरूर स्थान द्यावे. आता आपण सर्वांनीच एकजुटीने कामास लागून खरीप हंगामातील नुकसान भरून काढण्याचे व रब्बी हंगामात उत्पादनवाढ करण्याचे प्रयत्न केले पाहिजेत.

शेतकऱ्यांच्या अडीअडचणी दूर करण्यासाठी आणि त्यांना दिलासा देण्यासाठी आत्तापर्यंत ज्या योजना आखण्यात आल्या आहेत, त्या अंमलात आणण्यासाठी पुरेशा निधींची तरतूद केली गेलेली आहे तसेच स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन या योजनांत आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार जिल्हा प्रशासनास देण्यात आलेले आहेत. देशांतर्गत कृषी उत्पादन वाढीसाठी त्याचा पुरेपूर लाभ करून घ्या, असे माझे तुम्हाला आवाहन राहील.

पावसाने अधिक ओढ दिली तर आपदग्रस्त गोरगरिबांच्या मदतीसाठी अनेक राज्यांना तातडीचे उपाय योजावे लागण्याचीही शक्यता आहे. ते लक्षात घेऊन त्यासाठी त्यांना आपदग्रस्त

सहाय्यता निधी आधीच उपलब्ध करून देण्यात आले आहेत. आसाम, बिहार, झारखंड व उत्तर प्रदेश या राज्यांना तेथील परिस्थितीचे गांभीर्य पाहून या निधीचा पहिला हप्ताही दिला गेला आहे. झारखंड, उत्तर प्रदेश, मणीपूर, बिहार, मध्यप्रदेश व कर्नाटक या राज्यांकडून अतिरिक्त केंद्रीय सहाय्याची मागणी करणारे प्रस्ताव आले आहेत. त्याची दखल घेऊन केंद्र सरकारने खास आंतरमंत्रीय पथके स्थापली आहेत. ही पथके संबंधित राज्यांच्या दौरा करून तेथील परिस्थितीची प्रत्यक्ष पाहाणी करतील आणि मग त्यांच्या शिफारशींनुसार या राज्यांना अतिरिक्त मदत पुरविण्यात येईल. त्यासंबंधातील निर्णय विनाविलंब घेण्यासाठी मंत्र्यांची उच्चस्तरीय समितीही नेमण्यात आली आहे.

एकंदर निर्णयप्रक्रियेस गती मिळावी आणि काही अनपेक्षित परिस्थिती उद्‌भवल्यास तिलाही योग्य प्रकारे तोंड देता यावे म्हणून केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एका मंत्रीगटाची स्थापना करण्यात आली आहे. दुष्काळ व्यवस्थापनाशी संबंधित सर्व विषयांवर आवश्यक ते निर्णय घेण्याचे सर्वाधिकार या गटाकडे आहेत. याखेरीज, विभिन्न मंत्रालयांच्या कामकाजात समन्वय राखण्यासाठी कॅबिनेट सचिवांच्या नेतृत्वाखाली एक स्वतंत्र समितीही स्थापण्यात आली आहे.

आता याच प्रकारची व्यवस्था दुष्काळग्रस्त राज्यांमध्ये आकारास येणे जरुरीचे आहे. त्यायोगे बदलत्या परिस्थितीचे पुनर्विलोकन नियमितपणे होण्यास हातभार लागेल. एकूण माहितीची देवाण-घेवाण तातडीने व्हावी व सर्व संबंधित खात्यांच्या कारभारात सुसुत्रता राहावी म्हणून राज्यांच्या राजधान्या व जिल्हा स्तरावर नियंत्रण कक्ष उभारले जावेत. या नियंत्रण कक्षांनी आमच्या मंत्रालयातील नियंत्रण कक्षाशी सदैव संपर्कात राहाणे अपेक्षित आहे.

या भाषणाचा समारोप करताना मी सर्व राज्यांच्या कृषी खात्यांना सध्याच्या संकटास सामोरे जाण्यासाठी सज्ज होण्याचे आवाहन पुन्हा एकवार करीत आहे. आपदग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी उभ्या पिकांचे रक्षण करण्यासाठी व या हंगामातील उत्पादन तूट रब्बीच्या हंगामात भरून काढण्यासाठी आपण सर्वांनी एकजुटीने व विनाविलंब आवश्यक ती सर्व पावले उचलणे, हीच आजची खरी गरज आहे. तुम्हा सर्वांच्या सहकार्याने आपण सध्याच्या संकटावर मात करण्यात आणि अन्नधान्य उत्पादनवाढीचा वेग पुन्हा प्राप्त करण्यात निश्चितपणे यशस्वी होऊ असा मला विश्वास वाटतो.

●●●



*अपुऱ्या पावसामुळे जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही भेडसावतो आहे.*




# आता कसोटी प्रशासन कौशल्याची

**- शरद पवार**

''पावसाने ओढ दिल्यामुळे यंदा देशाची कृषी आघाडी काहीशी अडचणीत आली आहे. परंतु अशा संकटसमयीच प्रशासन कौशल्याची खरी कसोटी लागत असते. या कसोटीस आपण सर्वजण पुरेपूर उतरू आणि कृषी उत्पादनाचे नुकसान व जनसामान्यांची हलाखी याचे प्रमाण कमीतकमी राखू अशी मला खात्री आहे...''

नवी दिल्ली ८ ऑगस्ट २००९ रोजी सर्व राज्यांच्या प्रमुख सचिवांची बैठक झाली. त्यात केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी केलेले भाषण.

पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंगजी, कॅबिनेटचे सचिव, भारत सरकारचे सचिव, राज्यांचे मुख्य सचिव आणि येथे उपस्थित असलेला अन्य सर्व अधिकारी वर्ग, देशाच्या अनेक भागात अपुरा पाऊस पडल्यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा विचार करण्यासाठी होत असलेल्या या परिषदेत मी आपणा सर्वांचे स्वागत करतो. पावसाने ओढ दिल्याने यंदा खरिपाच्या हंगामावर परिणाम होण्याची शक्यता आहे. तो कमीतकमी व्हावा आणि देशातील कृषी उत्पादनाची आघाडी सुरक्षित राहावी, यासाठी येथील विचारमंथनातून काही ठोस उपाययोजना आकारास येणे अपेक्षित आहे.

यंदा देशात एकूण सरासरीच्या ९६ टक्के पाऊस पडेल असा भाकितवजा अंदाज राष्ट्रीय वेधशाळेकडून प्रारंभी व्यक्त करण्यात आला होता. परंतु आत्तापर्यंत देशाच्या वायव्य व ईशान्येकडील प्रदेशात त्यापेक्षा २५ टक्के कमी पाऊस झालेला आहे. या अपुऱ्या पावसाचा फटका भात लागवडीस बसला असून आज अखेर फक्त नेहमीच्या ५८ टक्के क्षेत्रात पेरण्या झाल्या आहेत. उसाच्याबाबतीतही हीच परिस्थिती असून, सध्याच्या हवामानाचा फटका त्या उत्पादनासही बसण्याची शक्यता आहे. भाताच्या तुलनेत अन्य तृणधान्यांच्या पेरणीचे प्रमाण चांगले असले तरी एकूण परिस्थिती चिंताजनकच मानावी लागेल. ती अधिक बिघडू नये आणि उभ्या पिकांचे अधिक नुकसान होऊ नये यासाठी आता पूरक पाणीपुरवठा योजना राबविण्याची तातडीने गरज आहे. ज्या राज्यांमधील शेती मुख्यतः पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे त्यांच्या दृष्टीने तर अशा योजना फार महत्त्वाचा आहेत. अर्थात पूरक पाटबंधारे योजनांमुळे शेतकऱ्यांवर अधिक खर्चाचा बोजा पडणार आहे, हे लक्षात घेऊन भारत सरकारने डिझेल अनुदान योजनेची घोषणा यापूर्वीच केली आहे. त्यासाठी होणाऱ्या खर्चाचा ५० टक्के भार केंद्र सरकार उचलणार असून, दुष्काळप्रवण क्षेत्रातील शेतकऱ्यांना संबंधित राज्य सरकारे डिझेलवर प्रतिलिटर जास्तीतजास्त साडेसात रुपये अनुदान उपलब्ध करून देतील. त्याचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांना मिळावा

*भुरभुर पावसावरही बाजरीचे जोमदार पीक उभे आहे.*





*नवी दिल्ली येथे झालेल्या सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांच्या बैठकीत कॅबिनेट सचिव के. एम. चंद्रशेखर बोलत असून, व्यासपीठावर पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग, कृषीमंत्री शरद पवार, प्रो. के. व्ही. थॉमस आणि पंतप्रधानांचे प्रधान सचिव टी. के. अे. नायर*

यासाठी ही योजना अगदी तातडीने व कार्यक्षमरीत्या अंमलात आणावी, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

शेतीची सर्व कामे वेळेत पूर्ण व्हावीत म्हणून अवर्षणग्रस्त राज्यांना 'सेंट्रल पूल'मधून अतिरिक्त वीज पुरविण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे.

ज्या राज्यांमध्ये चांगला पाऊस पडत आहे तेथील कृषी उत्पादनक्षमता व उत्पादन वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना खते व कीडप्रतिबंधक औषधांसारख्या गोष्टींच्या बरोबरीने पतपुरवठाही सुरळीत व पुरेसा होईल, याची दक्षता घेतली जाण्याचीही गरज आहे. त्यादृष्टीने खत मंत्रालयाचे अधिकारी माझ्या मंत्रालयाशी सतत विचारविनिमय करीत असून देशात सर्व ठिकाणी मागणीनुसार खतपुरवठा होईल, याची काळजी घेत आहेत. खतांची वाहतूक व वितरणात काही अडथळे येत असतील तर त्यांचे निराकारण तातडीने केले जावे.

आपल्या पर्यायी पीक योजनांसाठी टीएल(ट्रुथफुली लेबल्ड) बियाणे वापरण्याची परवानगी मिळावी, अशी मागणी सध्या राज्य सरकारांकडून होत आहे. सामान्यतः शासकीय कार्यक्रमांमध्ये असे बियाणे वापरण्यास परवानगी दिली जात नाही, परंतु अपवाद म्हणून केंद्र सरकारने यावेळी ती दिली आहे. त्यामुळे आता आपापल्या राज्यातील शेतकऱ्यांना फायदेशीर व सोयीस्कर ठरू शकतील अशा पर्यायी पीक योजना आखणे राज्य सरकारांना शक्य होईल. त्या आखताना उर्वरित खरीप हंगामातील उत्पादनात कमीतकमी घट होईल आणि ही घटही रब्बी हंगामात भरून निघेल याकडे लक्ष दिले जाणे जरुरीचे आहे. त्यादृष्टीने विचारविनिमय करण्यासाठी कृषी मंत्रालयातर्फे राज्य सरकारी प्रतिनिधींच्या खास बैठका घेतल्या जाणार आहेत.

अपुऱ्या पावसांमुळे चाऱ्याची उपलब्धताही घटणार आहे. त्याचा अंदाज घेऊन राज्य सरकारांनी 'फॉडर बँका' उभारण्याची आणि चारा वाजवी दरात उपलब्ध व्हावा म्हणून किंमत नियंत्रण उपाययोजना करण्याची गरज आहे. ज्या शेती क्षेत्रात पावसाअभावी अन्नधान्याचे उत्पादन करणे शक्य नसेल तेथे चाऱ्याची (फॉडर क्रॉप्स) लागवड करण्यास उत्तेजन दिले जाण्यास हरकत नाही.

सद्यस्थितीत पिण्याच्या पाण्याची टंचाई हाही चिंतेचा विषय बनू शकतो, त्याची दखल घेऊन भूगर्भातील पाणीपातळीच्या आधारावर मोठ्या प्रमाणात ट्युबवेल्स खोदण्याची आवश्यकता आहे.

अर्थात एकीकडे ही सर्व पावले टाकत असताना येत्या काही महिन्यात दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने काही मदत पुरविण्याची जबाबदारीही राज्य सरकारांना पार पाडावी लागेल. त्यासाठी त्यांच्या अखत्यारीत 'कॅलॅमिटी रिलीफ फंड' आहेच.

परंतु त्या व्यतिरिक्त केंद्र सरकारकडूनही त्यांना अतिरिक्त सहाय्य मिळू शकेल. अशा मदतीची मागणी करणारे त्यांचे निवेदन केंद्र सरकारकडे आले की त्याची आंतरमंत्रीय पथके दुष्काळग्रस्त प्रदेशास भेट देतील आणि परिस्थिती सुसह्य होण्यासाठी एनसीसीएफ अंतर्गत नेमकी काय पावले टाकावीत यासंबंधात योग्य त्या सूचना देतील.

गेल्या वर्षी २५३ लाख टन गहू व ३२३ लाख तांदुळाची विक्रमी खरेदी झाली असल्यामुळे आज आपल्याकडे या दोन्हींचा भरपूर साठा आहे. परंतु आगामी हंगामातही सर्व खरीप पिकांची आणि त्यातही मुख्यतः तांदुळाची खरेदी वाढावी म्हणून सर्वतोपरी प्रयत्न होण्याची गरज आहे. सरकारी धान्यसाठा अपुरा राहील तर भाववाढीस तोंड फुटेल. त्यामुळे सार्वजनिक वितरणासाठी तरी आवश्यक तेवढा धान्यसाठा सरकारकडे कायम असणे अती महत्त्वाचे आहे. कमी पावसामुळे धान्याच्या किमती वाढू नयेत म्हणून आम्ही सर्व रेशनकार्ड धारक कुटुंबांना दहा किलो तांदूळ वा गहू देण्याची व्यवस्था केली आहे. याखेरीज दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना दर महिन्यास ३५ किलो धान्याचा पूर्ण कोटाही दिला जात आहे. अर्थात हे सर्व अन्नधान्य गरजू लाभार्थीपर्यंत नेमकेपणाने पोचेल याची खबरदारी घेणे ही राज्यांची जबाबदारी आहे आणि ती पार पाडण्यात कोणतेही राज्य कमी पडणार नाही अशी मला खात्री वाटते.

२००८-०९ या वर्षांत साखरेच्या उत्पादनात घट झालेली असली तरी सरकारकडे भरपूर साखर साठा असल्याने आत्तापर्यंत तरी त्याचे योग्य वितरण करणे आम्हाला शक्य आहे. साखरेची उपलब्धता वाढविण्यासाठी सरकारने कच्च्या व पांढऱ्या साखरेच्या आयातीवरील शुल्क माफ केले आहे. अर्थात यापुढील काळात मात्र राज्यांना साखरेच्या साठ्यावरील निर्बंधांची कसून अंमलबजावणी करावी लागेल तसेच उपलब्ध साखरेच्या साठ्यांचे योग्य व्यवस्थापनही करावे लागेल.

गेल्या काही काळात मुख्यतः डाळींच्या किमती फार मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. २००७-०८ साली आपल्याकडे १४.७६ दशलक्ष टन एवढे डाळींचे उत्पादन झाले होते, २००८-०९ मध्ये मात्र हा आकडा १४.६६ दशलक्ष टनांवर आला. आपण दरवर्षी साधारणतः २५ ते ३० लाख टन डाळी आयात



*चारा बँक निर्माण करणे ही भविष्याची गरज आहे.*

करतो आणि यंदाही ती २६ लाख टन एवढी आहे. त्यामुळे डाळींचे भाव या पद्धतीने भडकण्यास काहीही कारण नाही. या असमर्थनीय भाववाढीस मुख्यतः वायदे बाजारातील हालचाली जबाबदार असून, काळाबाजार व साठेबाजीस पायबंद घालण्यासाठी कठोर पावले उचलली नाहीत तर ही भाववाढ रोखणे आपल्याला शक्य होणार नाही, यासंबंधातील सर्व अधिकार राज्यांकडे आहेत त्यामुळे त्यांनी त्याचा प्रभावीपणे वापर करावा, असे माझे त्यांना आवाहन राहील.

भाववाढीस आळा घालण्यासाठी यापुढेही आवश्यकता भासेल तेव्हा केंद्र सरकार खुल्या बाजारपेठेत हस्तक्षेप करणार आहे. आता आपापल्या राज्यात अन्नधान्याचे न्याय्य वितरण होण्यासाठी राज्य सरकारांनीही आवश्यक ती यंत्रणा उभी करावी.

कृषी उत्पादकता व उत्पादन वाढविण्यासाठी राज्य सरकारांतर्फे होत असलेल्या प्रयत्नांना पाठिंबा म्हणून भारत सरकारने केंद्रीय सहाय्य कार्यक्रमांच्या अनेक योजना आखल्या आहेत. त्यात राष्ट्रीय कृषीविकास योजना- राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान- राष्ट्रीय बागायत अभियान व आयएसओपीओएम (डाळी, तेलबिया, मका आदीसाठीची एकात्म योजना) आदींचा अंतर्भाव असून त्या राज्य सरकारांना त्यांच्या कृती कार्यक्रमांची अंमलबजावणी व त्यांच्या कृषीक्षेत्राचे व्यवस्थापन अधिक योग्यप्रकारे करण्यास सहाय्यक ठरत आहेत. अर्थात या सर्व संधींचा लाभ राज्यांकडून मात्र पुरेपूर घेतला जात नाही, हे मी येथे खेदपूर्वक नमूद करू इच्छितो. केंद्रीय योजनांच्या अंमलबजावणीसाठी देण्यात आलेले निधी अनेक राज्यांकडे पडून आहेत. सध्याच्या परिस्थितीवर मात करण्यासाठी त्यांनी या निधींचा उपयोग तातडीने करणे जरुरीचे आहे.

यापूर्वीची दुष्काळी वर्षे आणि यंदाचे वर्ष यात खूप मोठा फरक असून, त्यास मुख्यतः एनआरईजीएस अंतर्गत पुरेशा निधींचा उपलब्धता जबाबदार आहे. हे निधी अवर्षणप्रवण दुष्काळी प्रदेशात नव्या रोजगारसंधी तर उपलब्ध करून देतातच परंतु त्या प्रदेशातील पाण्याची साठविणे सर्व लक्ष केंद्रित करण्याची संधीही तुम्हाला मिळवून देतात. छोट्या दुर्बल शेतकऱ्यांना जमिनींवर अशी कामे सुरू करणे शक्य व्हावे म्हणून ग्रामीण विकास खात्यातर्फे नुकत्याच काही सूचना जारी करण्यात आल्या आहेत. अधिक पाण्याची





साठवण करून कृषी उत्पादकता वाढविण्यासाठी आपण या नव्या संधीचा योग्यप्रकारे उपयोग करून घ्याल, याची मला खात्री आहे.

हवामानातील बदलांमुळे होत असलेल्या परिणामांना यशस्वीपणे सामोरे जाण्यासाठी आपण आता एक दीर्घकालीन कार्यक्रम आखण्याचा विचार करणे जरुरीचे आहे. पाण्याचे अधिक चांगले व्यवस्थापन- पिकांचे योग्य नियोजन व त्यानुसार बियाणांचे व्यवस्थापन- शेतकरीवर्गाशी अधिक चांगला सुसंवाद- पिकांवरील रोग व किडीस आळा आणि हंगामपूर्व व हंगामोत्तर अशा दोन्ही वेळी होणारी पिकांची नासाडी अशा सर्व महत्त्वाच्या विषयांवर विचारमंथन करून आपण हा कार्यक्रम आकारास आणला पाहिजे. राज्यांच्या कृषीखात्यांची क्षमता व दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक ते सहाय्य करण्याची विनंती भारतीय कृषी अनुसंधान परिषद शास्त्रज्ञ-संशोधकांना करण्यात आली आहे. सध्या एनआरएएमधील तज्ज्ञ मंडळी विविध राज्यांना भेट देत असून तेथील अडचणींवर मात करण्यासाठी आवश्यक असलेले मार्गदर्शन संबंधितांना देत आहेत. कृषीउत्पादकता व उत्पादन वाढविण्यासाठी सर्व राज्यांना केंद्राकडून सर्वतोपरी सहाय्य केले जाईल, असे आश्वासन देत असताना मी या भाषणातील काही महत्त्वाच्या मुद्द्यांचा निर्देश येथे पुन्हा एकवार करू इच्छितो. हे मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत :

१) ज्या राज्यांमध्ये चांगला पाऊस झालेला आहे त्यांनी त्यांचे उत्पादन व उत्पादकता अधिक वाढविली पाहिजे.

२) भूगर्भातील पाणी आणि अन्य जलस्त्रोत वापरून राज्यांनी आपापल्या प्रदेशातील उभ्या पिकांचे रक्षण करावे.

३) पिण्याचे पाणी, अन्नधान्य व चाऱ्याचे दुर्भिक्ष्य जाणवू नये म्हणून आगावू नियोजन केले जावे.

३) सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत उपलब्ध धान्याचे प्रभावी पद्धतीने वाटप.

४) रब्बीच्या हंगामाचे लवकर पुर्वनियोजन.

५) भारत सरकारच्या विविध योजनांसाठी उपलब्ध होणाऱ्या निधींचा कल्पक व सुयोग्य वापर.

देशांतर्गत एकूण परिस्थितीवर केंद्र सरकारने बारकाईने लक्ष ठेवून आहे. यंदाचे वर्ष तसे थोडे कठीण आहे हे मीही मान्य करतो. परंतु अशा संकटसमयीच चांगल्या प्रशासनाची कसोटी लागत असते हे विसरून चालणार नाही. तुम्ही सर्वजण या कसोटीला पुरेपूर उतराल आणि नुकसान व हलाखीचे प्रमाण कमीतकमी राहील याची दक्षता घेऊन जनसामान्यांचा या देशाच्या प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ कराल, अशी मला खात्री आहे.

●●●

# अन्नसुरक्षा कायद्याच्या अंमलबजावणीस केंद्र सरकार वचनबद्ध...



**– शरद पवार**



नवी दिल्ली येथे १९ ऑगस्ट, २००९ रोजी राज्यांच्या अन्नमंत्र्यांच्या परिषदेत केंद्रीय कृषी व नागरीपुरवठा मंत्री श्री. शरद पवार भाषण करताना

विविध राज्य सरकारांचे अन्न व नागरीपुरवठा मंत्री आणि विविध राज्ये व केंद्रशासित प्रदेशांचे प्रशासक व अधिकारीवर्गाचे मी या महत्त्वपूर्ण परिषदेत स्वागत करतो.

देशातील अनेक राज्यांत मान्सूनचा पाऊस उशिरा व अपुरा पडल्यामुळे २००९-१० च्या खरीप हंगामातील धान्योत्पादनासंबंधात सध्या चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे, हे आपण सर्वजण जाणताच. आत्तापर्यंत देशभरात सर्वसाधारण सरासरीपेक्षा २९ टक्के कमी पाऊस झाला असून, उत्तर-पश्चिम भारतात तर हे प्रमाण ४३ टक्के आणि मध्य भारतात ३६ टक्के इतके कमी आहे. ७२ टक्के जिल्ह्यांमध्ये अपुऱ्या व अत्यल्प पावसाने हजेरी लावली असून, त्याचा परिणाम तांदूळ, तेलबिया व उसाचे उत्पादन घटण्यात होणे अपरिहार्य आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा भातशेतीचे क्षेत्र ६५ लाख हेक्टरने घटले असून, त्यामुळे तांदुळाचे उत्पादन एक कोटी टनांनी घटण्याची शक्यता आहे.

एकूणच, आज अनेक राज्यांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, त्यावर मात करण्यासाठी केंद्र, राज्य सरकारे व केंद्रशासित प्रदेशांच्या दुष्काळ व्यवस्थापन धोरणे व कार्यक्रमांची अंमलबजावणी अतिशय काटेकोरपणे होणे जरुरीचे आहे. या नव्या आव्हानाची कल्पना राज्यांच्या प्रशासनांना देण्यासाठी आम्ही ८ ऑगस्टला राज्यांच्या मुख्य सचिवांची बैठक घेतली होती. त्यास बहुतेक सर्व राज्यांचे अन्न सचिवही उपस्थित होते. याखेरीज, १७ ऑगस्ट रोजी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या बैठकीतही या विषयावर तपशीलाने चर्चा झाली. दुष्काळाचा सामना योग्य प्रकारे होण्यासाठी नेमके काय करावे यासंबंधीच्या



अनेक मूल्यवान सूचना व विचार या दोनही बैठकांमध्ये मांडले गेले आहेत. दुष्काळ व्यवस्थापनाच्या व्यूहरचनेत अन्न व नागरीपुरवठा खात्यांना फार महत्त्वाचे स्थान आहे आणि त्यामुळेच आज तुम्हा सर्वांना येथे मुद्दाम आमंत्रित केले आहे. दुष्काळाच्या मुकाबल्यासाठी भारत सरकारने अनेक निर्णय घेतले असून, ते अंमलात आणण्यात आता तुमचे संपूर्ण सहकार्य मिळावे अशी अपेक्षा आहे. ते मिळाले तरच समाजातील दुर्बल घटकांना बसणाऱ्या दुष्काळांच्या झळांची तीव्रता काही प्रमाणात तरी कमी होऊ शकेल.

देशातील सर्व नागरिकांच्या अन्नसुरक्षेची काळजी घेण्यास केंद्र सरकार वचनबद्ध आहे, हे मी येथे पुन्हा स्पष्ट करू इच्छितो. देशातील अन्नधान्य उत्पादनवाढीस आम्ही सर्वोच्च प्राधान्य देत असून, धान्योत्पादन व उत्पादनक्षमता या दोन्हींत वाढ करण्याच्या

''देशातील सर्व नागरिकांच्या अन्नसुरक्षेची काळजी घेण्यास केंद्र सरकार वचनबद्ध आहे, हे मी येथे पुन्हा स्पष्ट करू इच्छितो. देशातील अन्नधान्य उत्पादनवाढीस आम्ही सर्वोच्च प्राधान्य देत असून, धान्योत्पादन व उत्पादनक्षमता या दोन्हींत वाढ करण्याच्या उद्देशानेच राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान व राष्ट्रीय कृषीविकास योजनेची आखणी करण्यात आलेली आहे. अधिक उत्पादन करण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून २००३-०४ पासून गव्हाच्या किमान हमी किमती ७१.४ टक्क्यांनी तर तांदुळाच्या किमान हमी किम्मती ६३.६ टक्क्यांनी वाढविल्या गेल्या आहेत.''

उद्देशानेच राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान व राष्ट्रीय कृषीविकास योजनेची आखणी करण्यात आलेली आहे. अधिक उत्पादन करण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून २००३-०४ पासून गव्हाच्या किमान हमी किमती ७१.४ टक्क्यांनी तर तांदुळाच्या किमान हमी किमती ६३.६ टक्क्यांनी वाढविल्या गेल्या आहेत.

या साऱ्या पार्श्वभूमीवर मला हे सांगण्यास आनंद होतो की, सध्या केंद्राकडे असलेला धान्यसाठा अगदी समाधानकारक असा आहे. चालू हंगामात सरकारने गहू व तांदुळाची विक्रमी खरेदी केलेली आहे. आत्तापर्यंत २५३ लाख टन गहू व ३२६ लाख टन तांदुळाची खरेदी झाली असून, तुम्हा सर्वांच्या सहकार्यामुळेच हे शक्य झाले आहे. पुरेसा धान्यसाठा असल्यामुळेच सर्व राज्यांमधील दारिद्र्यरेषेखालील ६ कोटी ५२ लाख कुटुंबांना दरमहा ३५ किलो धान्य पुरविणे सरकारला शक्य होत असून, या सवलतीचा लाभ आता दारिद्र्यरेषेवरील कुटुंबांनाही दिला जात आहे. केंद्रीय साठ्यात भरपूर धान्य असल्यामुळे आम्ही यंदा एपीएलचा कोटा गतवर्षीच्या ११ दशलक्ष टनांवरून १७ दशलक्ष टनांवर नेण्यात यशस्वी झालो आहोत.

अर्थात या खरीप हंगामात तांदुळाचे उत्पादन घटण्याची शक्यता असल्याने त्याची उपलब्धता व बाजारपेठांतील किमती यावर परिणाम होऊ शकतो. तो कमीतकमी व्हावा म्हणून गरज भासली तर खुल्या बाजारपेठेतील विक्रीसाठी राज्य सरकारांना गहू व तांदूळ उपलब्ध करून देण्याचे पाऊल उचलण्यास सरकार अनुमान करणार नाही. त्यासाठी राज्य सरकारांनी सज्ज राहावे आणि ग्राहकांना वाजवी दरात गहू-तांदूळ वितरीत करण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा उभारावी. २००८-०९ साली खुली बाजारपेठ विक्री योजनेखाली केंद्राने राज्य सरकारांना ९.०९ लाख टन गहू उपलब्ध करून दिला होता, परंतु त्यापैकी फक्त ०.७४ लाख टन गहूच त्यांनी उचलला. केवळ अंदमान-निकोबार, दादरा-नगर हवेली व चंडीगड हे केंद्रशासित प्रदेश आणि आंध्र प्रदेश, आसाम, बिहार, महाराष्ट्र, मेघालय, मिझोराम, नागालँड, तामिळनाडू व ओरिसा ही राज्ये यांचाच त्या योजनेत सहभाग राहिला होता.

यावेळी मात्र अपुऱ्या पावसामुळे बहुतेक सर्व राज्यांकडून अतिरिक्त धान्यकोट्याची मागणी केली जात आहे. अर्थात,





आपली गव्हाची नेमकी गरज किती हे कळविण्याची विनंती राज्य सरकारांना केली गेली तेव्हा फक्त दिल्ली, झारखंड, जम्मू-काश्मीर, लक्षद्वीप व अंदमान-निकोबारच्या सरकारांनीच त्यास प्रतिसाद दिला आणि जम्मू-काश्मीर वगळता बाकी सर्वांनी आपल्याला खुल्या बाजारपेठेतील विक्रीसाठी धान्याची गरज नाही असे कळविले. राज्य सरकारांना आपल्या साठ्यातील गहू व तांदुळ किमान हमी किंमत अधिक रेल्वेवाहतूक खर्च या दराने उपलब्ध करून देण्याची केंद्र सरकारने दर्शविली आहे. त्याचा लाभ घेऊन आता राज्य सरकारे अर्थव्यवस्थेतील महागाईस पायबंद घालतील, अशी अपेक्षा आहे.

गरजू नागरिकांना सार्वजनिक वितरण योजनेखाली अधिकाधिक धान्य उपलब्ध करून द्यायचे तर सरकारी पातळीवर तांदुळाची जास्तीत जास्त खरेदी होणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्व राज्य सरकारांनी आपापल्या क्षेत्रातील राइस मिलर्सवर किमान ५० टक्के लेव्ही आकारली पाहिजे. या मिलर्सकडून होणाऱ्या तांदूळ-खरेदीची नोंद ठेवणारी योग्य यंत्रणाही त्यांनी उभारणे जरुरीचे असून लेव्ही आदेशांची प्रभावीपणे अंमलबजावणी केली पाहिजे. केरळ, तामिळनाडू, आसाम व पाँडिचेरी या राज्यांनी २००८-०९ वर्षांत तांदुळाची काहीही लेव्ही वसूल केलेली नाही. आता २००९-१० मध्ये सर्व राज्य सरकारांनी रोख पतपुरवठा मंजुरीची मर्यादा फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया व राज्य सरकारांदरम्यानचे मंडई वाटप-मिलिंग कंत्राटांना अंतिम रूप देणे आदि कामे योग्यप्रकारे पूर्ण करण्याची दक्षता घ्यावी, अशी आमची सूचना आहे. राज्य सरकारी संस्थांनी खरीदलेल्या तांदुळाची भरडणी ३१ मार्च २०१० पर्यंत पूर्ण केली जाणे आवश्यक आहे.

२००८-०९ सालात गहू व तांदुळाची विक्रमी खरेदी झाल्यामुळे, त्यांच्या यथायोग्य साठवणीच्या समस्येस फूड कॉर्पोरेशन व राज्य सरकारी संस्थांना सामोरे जावे लागत आहे. त्यावर मात करण्यासाठी सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर वाढीव साठवण क्षमता निर्माण करणारी एक योजना सरकारने आखली आहे. त्यात राज्यांच्या वेअरहौसिंग कॉर्पोरेशन्सनी महत्त्वाची भूमिका बजावली पाहिजे. दरम्यान, या योजनेत सहभागी होणाऱ्या खासगी भागीदारांना प्रोत्साहन म्हणून सरकारने काही प्राप्तीकर लाभांची घोषणाही केली आहे. सर्व राज्य सरकारांनी या योजनेच्या अंमलबजावणीस सर्वोच्च प्राधान्य द्यावे तसेच अतिरिक्त साठवण व्यवस्था उभारण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत.

गेल्या काही वर्षांत अन्नावरील सबसिडी अनेक पटीने वाढली असून, २००९-१० साली त्याचा आकडा साठ हजार



# उत्पादन घटल्यानेच साखरेचे भाव वाढले : शरद पवार



मुंबईतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात २८ ऑगस्ट २००९ रोजी झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना श्री. शरद पवार यांनी व्यक्त केलेले विचार.

हिंदुस्थानातील साखरेचा विषय हा 'सायक्लिक' आहे. हवामान आणि पावसाचे प्रमाण व उपलब्ध होणारे पाणी यावरून ऊस लागवडीच्या क्षेत्राची निश्चिती होते. गेल्या २५ वर्षांतील देशातील साखर धंद्याचे आपण बारकाईने अवलोकन केले तर असे लक्षात येते की पाच वर्षातील तीन वर्षे साखरेचे प्रचंड उत्पादन होते आणि दोन वर्षे उत्पादन घटते. गेली तीन वर्षे देशात ३०० लाख टनांपेक्षा जास्त साखर तयार झाली होती. ती ठेवायला गुदामांमध्ये जागा नव्हती आणि खरेदीसाठी तेवढे ग्राहकही नव्हते. साखरेचे भाव इतके कोसळले होते की काही साखर कारखान्यांची किमान किंमत उसाला देण्यासारखीही परिस्थिती राहिलेली नव्हती. गुदामात साखर साठवून ठेवणे आणि त्यावरती व्याज देणे यासाठी आठशे कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम केंद्राने खर्च करून साखर कारखान्यांना टिकून राहण्यासाठी बराच आर्थिक हातभार लावला. गेली तीन वर्षे साखरेचे आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत बाजारभाव खाली होते, पाण्याची उपलब्धताही कमी होती. त्यामुळे गहू व तांदूळ या दोन पिकांकडे वळण्याची प्रवृत्ती विशेषतः उत्तर हिंदुस्थानात वाढीला लागल्यामुळे उसाचे क्षेत्र घटून त्याचा परिणाम साखरेचे उत्पादन कमी होण्यावर झाला आहे.

दोन वर्षांपूर्वी देशाच्या पार्लमेंटमध्ये साखरेच्या विषयावर चर्चा झाली होती. त्यावेळी माझ्या उत्तरात मी स्पष्टपणे सांगितले होते की, जाणीवपूर्वक साखरेची किंमत वाढविण्याच्या भूमिकेला आपण पाठिंबा दिला नाही तर येत्या एक-दोन वर्षांत साखरेचे भाव २५ ते ३० रु. किलोच्या पुढे जातील. आज ती परिस्थिती देशासमोर आलेली आहे. देशातील डाळिंच्या उत्पादनाचा गेल्या १५ वर्षांचा इतिहास पाहिला तर आपल्या असे लक्षात येईल की, गरजेपेक्षा उत्पादन कमी होत आहे. मुख्यत्वे अवर्षणप्रवण व कमी पावसाच्या प्रदेशात आणि जिथे खात्रीचे पाणी नाही अशा ठिकाणी ही







डाळींची पिके घेतली जातात. देशात डाळिंचे उत्पादन १४ दशलक्ष टन होत असून, आपली वर्षाची गरज साडेसतरा ते अठरा दशलक्ष टन एवढी आहे. सुमारे ४ दशलक्ष टन डाळिंची दर वर्षी आयात करून आपल्याला आपली गरज भागवावी लागते. १० हजार कोटींपेक्षा जास्त रक्कम दरवर्षी आपण डाळिंच्या आयातीवर खर्च करतो. परंतु यंदा जेथून डाळ आणत होतो त्या देशातही डाळिंचे उत्पादन घटल्यामुळे मोठी अडचणींची परिस्थिती निर्माण झाली आहे. तूर आणि अन्य डाळींचे उत्पादन घटल्यामुळे त्यांच्या बाजारातल्या किमती वाढल्या आहेत. जगात जिथे जिथे म्हणून डाळ विक्रीसाठी उपलब्ध आहे तिथून ती खरेदी करण्याचा आपण प्रयत्न करतो आहोत. जगात साधारणपणे ५० लाख टन डाळ विक्रीसाठी उपलब्ध असून त्यातील २५ लाख टन डाळ आपण खरेदी केली आहे. आणखीन २० लाख टन डाळीची कमतरता भासते आहे. यासाठी खासगी व्यापारी व अन्य संस्थांना परदेशात पाठवून त्यांच्यामार्फत थोडे पैसे जास्त लागले तरी डाळ आयात करून लोकांची गरज भागविण्याचा प्रयत्न चालू आहे.

आपल्याकडे बहुतेक सर्व साखर कारखाने दिवाळीनंतर गळीत हंगाम सुरू करतात. यामुळे साखरेचे उत्पादन नोव्हेंबर महिन्यापासून सुरू होईल. दरम्यानच्या काळात दसरा, दिवाळी, रमझान ईद, ख्रिसमस या सणांसाठी लोकांना लागणारी साखर रेशन दुकानांमधून सरकारी दराने उपलब्ध करून द्यावी अशा तऱ्हेच्या प्रस्तावाला आम्ही मान्यता दिलेली आहे. साखर ही जीवनाश्यक वस्तू कायद्यात समाविष्ट असून राज्य सरकारने ठरविलेल्या साठ्याच्या प्रमाणापेक्षा ज्यांच्याकडे साखर, डाळी यांचा अधिक साठा केलेला असेल आणि जे काळ्या बाजाराने या वस्तूंची विक्री करीत असतील त्यांच्याविरुद्ध सक्त कारवाई करावी, अशा प्रकारच्या सूचना अन्नमंत्र्यांच्या परिषदेत आम्ही दिल्या आहेत. मला आनंद आहे की, विविध राज्यातील अन्न नागरी पुरवठा विभागांनी या जीवनाश्यक वस्तू कायद्याची कडक अंमलबजावणी करून साठेबाजांविरुद्ध कडक कारवाई सुरू केलेली आहे. त्यामुळे साठेबाजीच्या प्रवृत्तीला निश्चित आळा बसू शकेल.



*आता यापुढे भाताचे साळवण चाऱ्यासाठी वापरावे लागेल.*

कोटींवर जाईल, असा अंदाज आहे. पंजाब, हरियाना व आंध्र प्रदेशच्या सरकारांना माझी विनंती आहे की, सरकारी संस्थांनी खरीदलेल्या अन्नधान्यावर ते आकारत असलेल्या जादा करांचा त्यांनी फेरविचार करावा. अडत्यांना दिले जाणारे कमिशन किमान हमी किमतीच्या टक्केवारीनुसार निश्चित केले आहे. त्यामुळे हमी किमती वाढल्या की अडत्यांना मिळणारी कमिशनची रक्कमही वाढते. यासंदर्भात तसेच राज्य सरकारी संस्थातर्फे होणाऱ्या नैमित्तीक खर्चाबाबत विचार करण्यासाठी नेमलेल्या समितीचा अहवाल आमच्या खात्याने यापूर्वीच सर्वांना वितरित केलेला आहे. त्यात सुचविण्यात आलेल्या शिफारसी अंमलात आणण्यासाठी राज्य सरकारे सर्वतोपरी प्रयत्न करतील आणि धान्यखरेदीवर होणारा नैमित्तिक खर्च आटोक्यात आणतील, अशी अपेक्षा आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या कामकाजाचा अभ्यास सरकारने आजवर अनेकदा केला आहे. त्यात, विविध राज्यांमध्ये अनुदानित अन्नधान्य फार मोठ्या प्रमाणात अन्यत्र वळविले जाते व त्यात प्रचंड गळती होते, असे आढळून आलेले आहे. देशातील गोरगरिबांसाठी सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिले जाणारे अन्नधान्य त्यांच्यापर्यंत पोहोचू नये, ही फार गंभीर बाब आहे. ही योजना राबविण्यासाठी सरकार सध्या जो खर्च करते त्याची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे. एवाय श्रेणीतील नागरिकांसाठी दिल्या जाणाऱ्या गहू व तांदुळावर अनुक्रमे ७२ व ८४ टक्के अनुदान दिले जाते तर एपीएल व बीपीएल श्रेणीतील नागरिकांना ५९ ते ७० टक्के सवलतीच्या दराने हे अन्नधान्य पुरविले जाते. त्यामुळे या अनुदानाचा लाभ सर्व संबंधितांना योग्य प्रकारे मिळावा यासाठी आपापल्या क्षेत्रातील स्वस्त धान्य दुकानांचा कारभार पारदर्शी पद्धतीने व अतिशय कार्यक्षमतेने होईल, याची दक्षता सर्व राज्य सरकारांनी घेणे जरुरीचे आहे.

स्वस्त धान्य योजनेचा लाभ फक्त पात्र गरीब कुटुंबांनाच मिळावा, यासाठी राज्य सरकारने अशा कुटुंबाच्या नावाच्या याद्यांची फेरतपासणी पुनःपुन्हा केली पाहिजे आणि बनावट रेशनकार्ड धारकांची नावे त्यातून कटाक्षाने वगळली पाहिजेत.

अनुदानित आयात खाद्यतेलांचे वाटप मार्च २०१० पर्यंत राज्य सरकारे व केंद्रशासित प्रदेशांमार्फत करण्याची योजना पुन्हा सुरू करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्याअंतर्गत उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या आयात तेलाचा उपयोग राज्य सरकारे पुरेपूर करून घेतील आणि ते तेल गोरगरिबांपर्यंत पोचवून खाद्यतेलाच्या किमती नियंत्रणाखाली राखतील अशी अपेक्षा आहे.

चालू हंगामात साखरेचे उत्पादन २६३ लाख टनांवरून १६० लाख टनांवर आले आहे. एकूण देशांतर्गत मागणी २२५ ते २३० लाख टनांची असल्याने ही उत्पादनघट भाववाढीस आमंत्रण देणारी ठरली आहे. आता पुढील हंगामातही साखरेचे उत्पादन वाढण्याची फारशी शक्यता नाही. या टंचाईवर मात करण्यासाठी सरकारने अनेक पावले उचलली असून, ३१ मार्च २०१० पर्यंत कच्च्या साखरेच्या आयातीवरील शुल्क माफ केले आहे. दहा लाख टनांपर्यंतच्या आयातीस ही योजना लागू राहणार असून, त्याचा लाभ केंद्र व राज्य सरकारी संस्थाप्रमाणे खासगी व्यापारीही घेऊ शकतील. या उपाययोजनेमुळे चालू व पुढील हंगामातही देशातंर्गत साखर पुरवठ्यात सुधारणा होण्याची शक्यता

आहे. परंतु दरम्यान काही राज्य सरकारांनी आयात साखरेवर विक्रीकर/व्हॅट लादला आहे. ग्राहकांचे हित लक्षात घेऊन त्यांनी ही करआकारणी रद्द करावी अशी आमची सूचना आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी अधिक साखर उपलब्ध करून देता यावी म्हणून लेव्ही साखरेचे प्रमाण वाढविण्याचा विचारही सरकार करीत आहे. ही जादा साखर गरजू लाभधारकांपर्यंत कशी पोचेल, याचा विचार मात्र आपल्या सर्वांना आता एकत्रितरित्या करावा लागणार आहे.

साखरेची साठेबाजी व काळ्या बाजारास आळा घालण्यासाठी जानेवारी २०१० पर्यंत साखर व्यापारावर काही निर्बंध लादण्यात आले आहेत. परंतु आत्तापर्यंत फक्त सोळा राज्ये/केंद्रशासित प्रदेशांनी हे निर्बंध अंमलात आणण्यासाठी आवश्यक असलेली यंत्रणा उभारलेली असून इतरांनी त्याकडे अजिबात लक्ष दिलेले नाही. सध्याच्या टंचाईच्या परिस्थितीचा गैरफायदा उठविण्याची संधी कोणालाही मिळू नये, यासाठी आवश्यक ती सर्व पावले सर्वच राज्यांनी विनाविलंब उचलणे जरुरीचे आहे.

गेल्या काही आठवड्यात चलनवाढीचा एकूण दर नकारात्मक राहिला असला (घाऊक किंमत निर्देशांकानुसार) तरी अन्नधान्याच्या वाढत्या किमतीमुळे आम्ही चिंतेत आहोत. डाळी, भाज्या व साखरेसारख्या जीवनाश्यक वस्तूंचे भाव कडाडल्यामुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त असून, त्यांना दिलासा देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

सर्वसाधारणतः जीवनाश्यक वस्तूंच्या आयातीबाबतीत आम्ही अधिक उदार धोरण अवलंबित आहोत. त्यानुसार, मार्च २०१० पर्यंत डाळी व कच्च्या खाद्यतेलावरील आयातशुल्क पूर्णपणे माफ करण्यात आले असून रिफाइन्ड खाद्यतेलावर साडेसात टक्के दराने आयातशुल्क आकारले जात आहे. गेल्या वर्षी आम्ही सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत आयात खाद्यतेल व डाळींचे वितरण केले होते. त्यासाठी खाद्यतेलावर प्रतिकिलो १५ रु. व डाळींवर प्रतिकिलो १० रुपयांपर्यंत सबसिडी दिली गेली. त्यापैकी खाद्यतेलाबाबतच्या योजनेची मुदत मार्च २००९ मध्ये संपली होती पण आता ती पुन्हा सुरू करण्यात आली आहे. डाळींबाबतच्या योजनेची मुदत ३० सप्टेंबर २००९ ला संपत असून, ती वाढविण्याबाबत विचार सुरू आहे.

जीवनाश्यक वस्तूंची आयात व उपलब्धता वाढविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. परंतु त्यास जोड म्हणून जीवनाश्यक वस्तू कायदा व काळाबाजार प्रतिबंधक कायदा यांची अंमलबजावणी होणेही अतिशय महत्त्वाचे आहे. या कायद्यांमधील तरतुदींचा पूर्णपणाने उपयोग केला गेला तर साठेबाजी व काळ्याबाजारास निश्चितच आळा बसेल आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा दुरुपयोगही रोखला जाईल.

देशातील सर्व नागरिकांना अन्नसुरक्षा पुरविण्यासाठी राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायद्याची अंमलबजावणी करण्यास सरकार वचनबद्ध आहे. त्याअंतर्गत, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना दरमहा काही किमान धान्यकोटा सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिला जाईल. या संकल्पित कायद्यात अन्न सबसिडी व अन्नधान्यांच्या उपलब्धतेची निश्चिती आवश्यक असून या अन्नधान्याचे गरीब कुटुंबांना यथायोग्य वितरण आणि हे वितरण होऊ न शकल्यास नुकसानभरपाई या सर्व गोष्टी अनुस्युत राहातील. अर्थात केंद्र व राज्य सरकारांनी संयुक्तरित्या प्रयत्न केले तरच ही योजना वास्तवात उतरू शकणार आहे. सध्या आम्ही त्याबाबतच्या चर्चाप्रक्रियेतून जात आहोत. आत्तापर्यंत अनेक तज्ज्ञ मंडळीच्या सूचना व शिफारशीही आमच्याकडे आल्या असून, त्यापैकी काहींचा समावेश आज तुम्हाला येथे देण्यात आलेल्या कागदपत्रांत (अजेंडा नोट) करण्यात आलेला आहे. आता तुमची त्यासंबंधातील मते व विचार तुम्ही मोकळेपणाने व्यक्त करावेत, त्यांचे स्वागतच होईल.



●●●





# स्वायत्ततेखेरीज सहकारी संस्थांची कार्यक्षमता वाढणे अशक्य - शरद पवार



आपल्या देशातील सहकारी संस्थांना मोठा इतिहास असून, आज आर्थिक हालचालींच्या प्रत्येक क्षेत्रात त्यांनी स्थान मिळविले आहे. देशातील कृषी उत्पादन, त्यावरील प्रक्रिया आणि त्यांची बाजारपेठ या साऱ्या गोष्टी टिकवून धरण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व प्रमुख सेवा या संस्थांच पुरवित आहेत. परंतु स्वायत्ततेच्या अभावामुळे मात्र त्या पूर्णपणे सरकारवर अवलंबून असल्याचे चित्र दिसते. ही स्वायत्तता व स्वातंत्र्य मिळाल्याखेरीज या संस्था खऱ्या अर्थाने कार्यक्षम- व्यावसायिक संघटना बनू शकणार नाहीत.

**राजधानी दिल्ली येथे गेल्या महिन्यात राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाच्या जनरल कौन्सिलची बैठक झाली. त्यात कौन्सिलचे अध्यक्ष व केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी केलेले भाषण :**

कृषी व सहकार खात्याचे सचिव टी. नंदकुमार, जनरल कौन्सिलचे सन्मान्य सदस्य, राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक राजीव अग्रवाल आणि मित्रांनो,

राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाच्या जनरल कौन्सीलच्या या ६८ व्या बैठकीत आपणा सर्वांचे स्वागत करताना मला अतीव आनंद होत आहे. देशातील सहकारी चळवळीच्या विकासास या महामंडळाने आपल्या स्थापनेपासूनच फार मोठा हातभार लावलेला आहे. महामंडळाने गेल्या आर्थिक वर्षात आपले निहीत उद्दिष्ट गाठले असून १३२ कोटी रुपये निव्वळ नफा कमावला आहे, हे मी येथे सानंद जाहीर करू इच्छितो. महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक व त्यांच्या कार्यक्षम अधिकाऱ्यांच्या प्रयत्नांमुळेच हे यश मिळाले असून, त्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. आगामी काळात हे महामंडळ यशाची नवनवी शिखरे गाठेल आणि उत्तम कारभाराचा उत्तुंग आदर्श निर्माण करेल, अशी मला खात्री आहे.

कृषीक्षेत्र हा आपल्या अर्थव्यवस्थेचा मूलधार आहे, हे आपण सारेच जण जाणतो. गेल्या काही काळात नियोजनातील वाढीव तरतुदी व भांडवल उभारणीमुळे या क्षेत्राचा विकासदर सरासरी चार टक्क्यांवर गेला आहे. आजघडीस एकूण देशांतर्गत उत्पादनात कृषी व संलग्न क्षेत्राचा वाटा १७.८ टक्के एवढा असून, देशातील सुमारे ५२ टक्के कामकरी लोकसंख्येस तेच रोजगार पुरविते. सहकारी उद्योगांच्या स्थापनेस सक्रीय प्रोत्साहन आणि कृषी पतपुरवठ्याच्या कृती योजना यास आपल्या कृषीधोरणात फार महत्त्वाचे स्थान असून, सहकारी तत्त्वावर काम करणाऱ्या सर्व संस्थांना अधिक स्वायत्तता आणि आपला कारभार सुधारण्यासाठी आवश्यक ते स्वातंत्र्य देण्यास ते प्रयत्नशील आहे.

अर्थात बहुतेक सर्व पिकांच्या उत्पादनात आलेले शैथिल्य लागवडयोग्य जमिनीच्या विस्तारास असलेला मर्यादित वाव आणि घटत चाललेले कृषीक्षेत्र यामुळे आज देशाच्या कृषी आघाडीपुढे अनेक आव्हाने उभी राहिलेली आहेत. त्यांचा मुकाबला करायचा तर यापुढे उत्पादकता वाढीवर नव्याने भर द्यावा लागणार आहे. तसेच कृषीक्षेत्राशी संलग्न हालचालींची व्याप्ती वाढवित असताना बिगर-कृषी उद्योगांच्या विकासाकडेही लक्ष द्यावे लागणार आहे. याखेरीज उत्तम बाजारपेठा व शीतगृहांची साखळी उभारून आणि या बाजारपेठांचे व्यवहार आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित करून आपल्याला उत्पादक किंमत व ग्राहक किंमत यातील फरक कमी करणेही जरुरीचे आहे. आता ग्रामीण अर्थव्यवस्थेकडे आपण परस्परांशी संबंधित अनेक आर्थिक हालचाली व उद्योगांची अखंड साखळी म्हणूनच पाहिले पाहिजे आणि शेतीस बिगर-कृषी उपक्रमांची जोडही दिली पाहिजे.

देशाचे कृषीउत्पादन वाढविण्यास व शेतकऱ्यांचे उत्पन्न व राहणीमान उंचावण्यास भारत सरकार वचनबद्ध आहे याचा मी येथे पुनरुच्चार करू इच्छितो. ही उद्दिष्टे साधण्यासाठी २००९-१० च्या अर्थसंकल्पात अनेक उपायांची योजना करण्यात आली आहे. त्यात कृषी पतपुरवठ्याची रक्कम गेल्या वर्षीच्या २ लाख ८७ हजार कोटींवरून ३ लाख २५ हजार कोटींवर नेणे- कृषी कर्जमाफी व सवलत योजनेअंतर्गत २ हेक्टरहून अधिक जमिनीचे मालक असलेल्या शेतकऱ्यांना त्यांची ७५ टक्के कर्जफेड ३१ डिसेंबर २००९ पर्यंत करण्यास मुदतवाढ- तीन लाख रुपयांपर्यंतच्या कृषीकर्जावर व्याज अनुदान योजनेनुसार फक्त ७ टक्के दराने व्याजआकारणी- जे शेतकरी वेळेत कर्जफेड करतील त्यांना व्याजात एक टक्का सूट आणि राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेसाठी जादा निधींची तरतूद आदि गोष्टींचा समावेश आहे. खासगी सावकारांकडून बऱ्याच शेतकऱ्यांनी कर्जे घेतली आहेत. त्यांच्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी एक खास 'टास्क फोर्स' स्थापण्याचा प्रस्तावही मी मांडला आहे. या सर्व उपाययोजनांमुळे आपल्या कृषीअर्थव्यवस्थेत नवे चैतन्य निर्माण होईल, असा मला विश्वास वाटतो.

पंतप्रधानाच्या आर्थिक सल्लागार मंडळाचे प्रमुख डॉ. सी. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली भारत सरकारने कमिटी ऑन फिनान्शियल इनक्ल्युजनची स्थापना केली आहे. देशातील ७३ टक्के शेतकरी कुटुंबांना अधिकृत पत, कर्जस्रोत उपलब्ध नाहीत, असे तिच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्याची दखल घेऊन आता अशा कुटुंबांना सुलभतेने कर्ज उपलब्ध करून देऊ शकेल, अशी अभिनव यंत्रणा उभारली गेली पाहिजे.

आपल्या देशातील सहकारी संस्थांना मोठा इतिहास असून, आज आर्थिक हालचालींच्या प्रत्येक क्षेत्रात त्यांनी स्थान मिळविले आहे. देशातील कृषी उत्पादन, त्यावरील प्रक्रिया आणि त्यांची बाजारपेठ या साऱ्या गोष्टी टिकवून धरण्यासाठी आवश्यक



असलेल्या सर्व प्रमुख सेवा या संस्थांच पुरवित आहेत. परंतु स्वायत्ततेच्या अभावामुळे मात्र त्या पूर्णपणे सरकारवर अवलंबून असल्याचे चित्र दिसते. ही स्वायत्तता व स्वातंत्र्य मिळाल्याखेरीज या संस्था खऱ्या अर्थाने कार्यक्षम- व्यावसायिक संघटना बनू शकणार नाहीत.

त्या दृष्टीने सहकारी चळवळीत आवश्यक त्या सुधारणा घडवून आणण्यास व तिला तिचे मानाचे स्थान पुन्हा प्राप्त करून देण्यास भारत सरकार वचनबद्ध आहे. सहकारी संस्थांचे कामकाज लोकशाही- स्वायत्त व व्यावसायिक पद्धतीने व्हावे, म्हणून एक घटनादुरुस्ती विधेयक संसदेपुढे नुकतेच मांडले गेले आहे.

राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ हे डेव्हलपमेंट फिनान्सिंग इन्स्टिट्युशन स्वरुपाचे असून, सहकार क्षेत्रासाठी नियोजन, विकास व आर्थिक कार्यक्रम तयार करण्याची जबाबदारी त्याच्यावर सोपविण्यात आलेली आहे. ती योग्य प्रकारे पार पाडण्यासाठी हे महामंडळ सातत्याने प्रयत्नशील असून, सहकार क्षेत्राचे आर्थिक बळच नव्हे तर व्यावसायिक कार्यक्षमताही वाढविण्याकडे ते लक्ष देत आहे. एका बाजूला आपला व्याजदर सातत्याने घटवित असताना सहकार क्षेत्राच्या विकासासाठी आखलेल्या आपल्या विविध योजनांना अनेक मंत्रालये व खात्यांच्या विशेष अनुदान योजनांची जोड देण्यातही ते यशस्वी झाले आहे. यापुढील काळात अधिक चांगली कामगिरी करून दाखविण्यासाठी ते सहकार क्षेत्राला मोलाची मदत करेल, अशी मला खात्री आहे.

कृषी व संलग्न कामांसाठी राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाने दिलेल्या कर्जांची गणना 'प्राधान्य क्षेत्रातील कर्ज' या श्रेणीत करण्यास रिझर्व्ह बँकेने नकार दिला आहे याची आपल्याला कल्पना आहेच. आता भारत सरकारने या प्रश्नात लक्ष घातले असून, सहकारी संस्थांना अल्प व्याजदरात पतपुरवठा करण्याबाबतच्या विविध पर्यायांचा विचार केला जात आहे.

भारतीय अर्थव्यवस्था प्रगतीपथावर असली तरी मोसमी पावसाने ओढ दिल्यामुळे सध्या सर्वदूर चिंतेचे वातावरण आहे. अर्थात ऑगस्ट महिन्यात देशाच्या काही भागात चांगला पाऊस पडलेला असल्यामुळे एकंदर परिस्थिती लौकरच बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सध्याच्या स्थितीला योग्यप्रकारे तोंड देण्यासाठी केंद्र सरकारने आकस्मिक योजना तयार ठेवली असून, आपापल्या क्षेत्रातील अवर्षणग्रस्त प्रदेशास आवश्यक ती पावले टाकण्याच्या सूचना सर्व राज्य सरकारांना देण्यात आल्या आहेत. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान व राष्ट्रीय कृषी विकास योजनेसाठी अधिक निधी उपलब्ध करून देण्याचा विचार कृषी मंत्रालय करीत असून या निधींचा वापर आपापल्या आवश्यकतेनुसार करण्याची मोकळीक राज्य सरकारांना दिली जाईल.

आजच्या बैठकीचा मुख्य अजेंडा २००९-१० सालासाठी राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाने आखलेल्या कार्यक्रमांवर चर्चा करणे, हा आहे. या कार्यक्रमांसाठी ३३०० कोटी रुपये खर्ची

पडणार असून, त्यास व्यवस्थापन मंडळाने यापूर्वीच मंजुरी दिली आहे. कृषी व संलग्न क्षेत्रातील सहकारी संस्थांच्या प्रगतीसाठी राज्य सरकारांतर्फे होत असलेल्या प्रयत्नांना पूरक असे काम महामंडळ याही वर्षी चालू ठेवणार आहे. या कामाचा भर अर्थातच सध्या अस्तित्वात असलेली यंत्रणा अधिक मजबूत करण्यावर तसेच शेतकऱ्यांच्या उत्पादनांवरील प्रक्रिया- ही उत्पादने खरीदून त्यांची बाजारपेठांत विक्री- आजारी संस्थांचे पुनर्वसन व आधुनिकीकरण आणि कार्यशाळांद्वारे महामंडळाच्या योजना व कार्यक्रमांबद्दल जनतेत जागृती निर्माण करणे यावर राहील. दुर्बल घटकांसाठी जे कार्यक्रम आखण्यात आले आहेत त्यात मच्छीमारी, दुग्धव्यवसाय, पोल्ट्री- हातमाग व अनुसूचित जाती-जमातींच्या सहकारी संस्था यांचा अंतर्भाव असून, त्यासाठी २३७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मार्केटिंग व इन-पुटस् प्रोग्रॅम्ससाठी १०२५ कोटी- ॲग्रो प्रोसेसिंग सहकारी संस्थांसाठी १००० कोटी, औद्योगिक पत व सेवा सहकारी संस्थांसाठी ८३५ कोटी आणि एकात्मिक सहकारी विकास प्रकल्पांसाठी १६५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. अकराव्या पंचवार्षिक योजना काळासाठी महामंडळाने १९६४० कोटी रुपये खर्चाचा कार्यक्रम आखला असून, देशभरातील अनेक सहकारी संस्थांच्या विकासास त्याची मोठी मदत होईल. आपणा सर्वांचे मार्गदर्शन आणि पाठिंब्याच्या बळावर महामंडळाचे सर्व कार्यक्रम व योजना पूर्णपणे सिद्धीस जातील, असा मला विश्वास आहे. स्वायतत्ता व स्वातंत्र मिळाल्याखेरीज देशभरातील सहकारी संस्था खऱ्या अर्थाने कार्यक्षम व्यावसायिक संघटना बनू शकणार नाहीत. त्या दृष्टीने सहकारी चळवळीत आवश्यक त्या सुधारणा घडवून आणण्यास सरकार वचनबद्ध आहे. सध्या राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (एनसीडीसी) नेमक्या त्याच दिशेने काम करीत असून, सहकार क्षेत्राचे आर्थिक बळ व व्यावसायिक कार्यक्षमता वाढविण्याकडे जातीने लक्ष देत आहे.

नव्या संधी आणि नवी आव्हाने यांनी भरलेल्या या नव्या युगात सहकारी चळवळीच्या प्रगतीसाठी आम्ही जी धडपड करीत आहोत त्यास तुमचा मनापासून हातभार लागावा हीच अपेक्षा. या परिषदेत तुम्ही आपले विचार, कल्पना व सूचना मोकळेपणाने मांडाव्यात जेणेकरून सहकार क्षेत्राची पाठराखण करण्याचे काम हे महामंडळ अधिक जोमाने करू शकेल.

●●●





# नारळ उत्पादनास चालनेसाठी केंद्राची खास योजना

- शरद पवार



केरळ व अंदमान-निकोबार बेटांवरील नारळ उत्पादनास अधिक चालना देण्यासाठी केंद्र सरकारने एका फार मोठ्या योजनेस मंजुरी दिली आहे, अशी घोषणा केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी नुकतीच केली. नवी दिल्ली येथे कोकोनट डेव्हलपमेंट बोर्डातर्फे आयोजित २००८ च्या राष्ट्रीय पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. संकल्पित योजना २२७५ कोटी रुपये खर्चाची असून, त्यास ४७८ कोटी रुपये केंद्रीय अनुदानाची जोड देण्यात येईल, असे सांगून श्री. पवार म्हणाले की नारळाच्या उत्पादनवाढीस केंद्र सरकार सर्वोच्च प्राधान्य देऊ इच्छिते. कोकोनट डेव्हलपमेंट बोर्डासाठी भांडवल म्हणून २००४-०५ च्या अर्थसंकल्पात फक्त वीस कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती, पण यंदा हा आकडा ७५ कोटी रुपयांवर नेण्यात आला आहे. खोबऱ्याची किमान हमी किंमत आता प्रतिक्विंटल ७९० रुपयांनी वाढविण्यात आलेली असून, ती ४४५० रुपयांवर नेली आहे. यापुढील काळात मात्र खोबऱ्याच्या किमती घसरू नयेत यासाठी बाजारपेठेत हस्तक्षेप करणारे कार्यक्रम आखण्याची जबाबदारी राज्य सरकारांची राहील.

नारळाच्या लागवडीचा फायदेशीरपणा वाढविण्याच्या दृष्टीने यापुढील काळात काम झाले पाहिजे, असे स्पष्ट करून श्री. पवार म्हणाले की, नारळाची उत्पादकता वाढविणारे कार्यक्रम अंमलात आणून आणि स्थानिक तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठांसाठी विविध प्रकारच्या उच्च मूल्य उत्पादनांची निर्मिती करून नारळाची लागवड अधिक फायदेशीर करण्याचे उद्दिष्ट साधता येईल. सध्या नारळाच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर इंडोनेशिया व फिलीपिन्सचे वर्चस्व आहे. आता भारतानेही त्यांच्या बरोबरीचे स्थान मिळविण्याचे ध्येय ठेवले पाहिजे. त्यादृष्टीने विशेष कृती ग्राम उद्योग योजनेखाली केंद्र सरकार कृषीआधारित उद्योगधंदे व उत्पादनांना भरपूर सहाय्य करीत आहे. त्याचा पुरेपूर लाभ उठवून नारळ उत्पादकांनी जागतिक बाजारपेठेत प्रवेश केला पाहिजे.

या समारंभात श्री. पवार यांच्या हस्ते देशातील सर्वोत्तम नारळ उत्पादक-निर्यातदार- प्रक्रियाकार व विकास कर्मचाऱ्यांना बोर्डाचे 'राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान करण्यात आले. त्यात केरळचे सबॅस्टियन ऑगस्टीन (पारंपरिक लागवड क्षेत्रातील सर्वोत्तम शेतकरी)- गुजराथचे चंद्राभाई बाळाभाई देसाई (अपारंपरिक लागवड क्षेत्रातील सर्वोत्तम शेतकरी)- अंगामली येथील सेवाश्रम (नारळाच्या नेहमीच्या उत्पादनांवरील कनव्हेनशनल प्रॉडक्टस्) (सर्वोत्तम प्रक्रिया)- कोची येथील इंडो-जर्मन कार्बन्स लि.




*नारळ विकास बोर्डाच्या पुरस्कार वितरण समारंभास केंद्रीय कृषीमंत्री श्री. शरद पवार बोलत असून व्यासपीठावर खासदार ए. ए. जिना, श्रीमती मिनी मॅथ्यू व खासदार पी. सी. चाको.*

## भारतीय नारळ उद्योगाची संक्षित माहिती

१) भारत हा जगातील एक मोठा नारळ उत्पादक देश असून, येथे दरवर्षी तेरा अब्ज नारळांचे उत्पादन होते.

२) देशातील १८ राज्ये व ३ केंद्रशासित प्रदेशांत नारळाची लागवड होते.

३) भारतीय नारळ लागवडीला तब्बल तीन हजार वर्षांची परंपरा आहे.

४) जगात सर्वोत्तम दर्जाचे खोबरे तयार होते ते मुख्यतः भारतामध्ये. चव आणि सुवास या दोन्ही बाबतीत भारतीय खोबरे सर्वोत्कृष्ट मानले जाते.

५) नारळाच्या प्राथमिक प्रक्रिया उद्योगांत फार मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांच्या सहकारी संस्थांचा सहभाग आहे.

६) 'ब्रँडेड' खोबरेल तेल उत्पादन व विक्रीत कराफेड, स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन, केरळ मार्केटिंग फेडरेशन व कर्नाटक स्टेट मार्केटिंग फेडरेशन या सरकारी संस्थांचा सहभाग.

७) शेकडो खासगी कंपन्याही नारळाची विविध उत्पादने व खोबरेल तेल उत्पादनात आघाडीवर.

८) निर्यातीसाठी विविध प्रकारची नारळ उत्पादने (खाद्य व अखाद्य) उपलब्ध. या सर्व उत्पादनात उच्च तंत्रज्ञान व कुशल मनुष्यबळाचा वापर.

९) आयसीएआर व डीआरडीओ सारख्या मान्यताप्राप्त संशोधन संस्थांच्या संशोधन कार्याचा सातत्याने लाभ.

१०) काथ्याच्या उत्पादनात भारत आघाडीवर.

नारळापासून देशात व्हिनेगार व शीतपेये बनविली जातात. नारळाच्या पाण्याचे जतन व पॅकिंगचे तंत्रज्ञान देशातील सहा मोठ्या फर्म्सना उपलब्ध करून देण्यात आले आहे.

## नारळापासून होणारी उत्पादने

१) नारळाचे पाणी २) खोबरे ३) खोबरेल तेल ४) कोकोनट केक ५) नारळाच्या झावळ्या
६) नारळाच्या कवचावर आधारित उत्पादने ७) नारळाच्या लाकडावर आधारित उत्पादने
८) कच्ची शहाळी ९) नारळाची नीरा (कोकोनट, ताडी, टॉडी) १०) काथ्या (कॉयर पिथ)





*केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांच्या शुभहस्ते गुजरातचे नारळ उत्पादक शेतकरी चंद्राभाई बाळाभाई देसाई यांना नारळाच्या अपारंपारिक लागवड क्षेत्रातला सर्वोत्तम शेतकरी पुरस्कार प्रदान करण्यात आला.*

(नारळाच्या नाविन्यपूर्ण (अन्-कनव्हेनशनल् प्रॉडक्टस्) उत्पादनांवरील प्रक्रिया आदिंचा समावेश होता. याखेरीज, गोव्याचे विजयदत्त लोटलीकर व बिहारचे निकुंज बिहारी यांचा सर्वोत्कृष्ट कारागिर म्हणून तर मल्लापूरम (केरळ) चे कृषी अधिकारी के. अब्दुल जब्बार यांचा सर्वोत्तम विकास कर्मचारी म्हणून सन्मान करण्यात आला. नारळाच्या उत्पादनांचे सर्वोत्तम निर्यातदार हा पुरस्कार त्रिसूरच्या केएलएफ ऑइल इंडस्ट्रीने पटकावला.

या समारंभाच्या अध्यक्षस्थानी संसद सदस्य ए.ए. जिना होते. त्यांनी आपल्या भाषणात, देशाच्या नारळ उद्योग विकासास दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या कारकिर्दीत प्रारंभ झाल्याचे आवर्जून सांगितले आणि नारळाच्या उत्पादनाच्या बाबतीत लौकरच तामिळनाडू राज्य केरळवर आघाडी मिळवेल, अशी ग्वाही दिली.

खासदार पी. सी. चाको यांनी प्रत्येक नारळास किमान साडेसहा रुपये तरी किंमत मिळणे जरुरीचे असल्याचे बोलून दाखविले आणि ती मिळत नसल्याबद्दल खंत व्यक्त केली. खोबऱ्यासाठी जाहीर करण्यात आलेली किमान हमी किंमत समाधानकारक आहे, पण त्याचा लाभ जेमतेम दहा टक्के खोबऱ्यास मिळतो, असेही त्यांनी निदर्शनास आणून दिले.

जुलै २००८ च्या तुलनेत खोबऱ्याचे भाव प्रतिक्विंटल १७३५ रुपयांनी घसरल्यामुळे सध्या नारळ उत्पादक मोठ्या अडचणीत आले आहेत, असे श्रीमती मिनी मॅथ्यू यांनी सांगितले. त्या म्हणाला की, खोबरेल तेलाच्या छोट्या पॅकस्ना केंद्रीय अबकारी कर लागू केल्यामुळे, त्याची मागणी घटली आहे.

या समारंभात डॉ. सी. व्ही. आनंद बोस, कोकोनट डेव्हलपमेंट बोर्डाचे उपाध्यक्ष व्ही. रवीकुमार व श्री. एम. थॉमस मॅथ्यू यांचीही भाषणे झाली.

●●●



# वाजवी किमतीत पुरेसा साखरपुरवठा करण्यास सरकार वचनबद्ध...



**– केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांची ग्वाही**

(१ सप्टेंबर २००९ रोजी नवी दिल्लीत भारतीय साखर शिखर परिषद (The Indian Sugar summit) झाली. त्यात केंद्रीय कृषी व अन्ननागरी पुरवठामंत्री शरद पवार यांनी केलेले भाषण.)

**देशातील ऊसउत्पादन कसे वाढवायचे आणि साखरेची देशांतर्गत मागणी कशी पूर्ण करायची, हा आपल्या सर्वांच्याच चिंतेचा विषयआहे. त्यावर मात करायची तर उसाची उत्पादकता वाढविणे व साखरेचा उतारा वाढविण्यासाठी संशोधनाआधारे उसाच्या नवीन जाती विकसित करणे, हे दोनच पर्याय आपल्याला सध्या तरी उपलब्ध आहेत...**

व्यासपीठावरील मान्यवर पाहुणे, भारतीय शिखर परिषदेचे आयोजक आणि प्रिय मित्रांनो,

आज व उद्या येथे होत असलेल्या या भारतीय साखर शिखर परिषदेत आपणा सर्वांचे स्वागत करताना मला अतीव आनंद होत आहे. भारत व ब्राझील हे जगातील दोन सर्वात मोठे साखर उत्पादक देश आहेत. हे आपण सर्वजण जाणताच. त्यापैकी ब्राझील आपले बहुतेक सर्व उत्पादन निर्यात करतो, तर भारत मात्र आपले बहुतेक सर्व उत्पादन वापरून टाकतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठांत भारताची उपस्थिती नेहमीच बदलती राहाते. ब्राझील हा साखर व इथेनॉलची नियमितपणे निर्यात करणारा देश असून, भारत या दोन्ही गोष्टी कधी आयात करतो तर कधी निर्यात. भारतीय साखर उद्योगाचे स्वरुप एखाद्या चक्रासारखे (Cyclical) आहे. दोन-तीन हंगाम ऊस व साखर उत्पादनाच्या दृष्टीने चांगले गेले की नंतरची एक-दोन वर्षे येथे ऊस व साखर उत्पादन हमखास घटते. हे उत्पादन वाढते तेव्हा देश साखर निर्यात करतो आणि घटते तेव्हा त्याला साखर आयात करावी लागते. अर्थात  भारत हा एवढा विशाल देश आहे की, तो निर्यात करो वा आयात, त्या दोन्हींचा परिणाम जागतिक बाजारपेठेवर व साखरेच्या किमतीवर निरपवादपणे होत असतो. आमच्या दृष्टीने २००६-०७ व २००७-०८ ही दोन्ही वर्षे चांगली गेली आणि त्या काळात आम्ही सुमारे सहा दशलक्ष टन साखर निर्यात केली. परंतु साखरेच्या आंतरराष्ट्रीय किमती मोठ्या प्रमाणात घसरल्याने भारतीय साखर कारखान्यांना बराच तोटा सहन करावा लागला. विशेष म्हणजे यंदा आमच्यावर साखर आयात करण्याची वेळ आलेली असताना तिच्या किमती सातत्याने वाढत आहेत.

उपरनिर्दीष्ट प्रश्नाचे मूळ शोधणे आता अतिशय गरजेचे झाले असून, माझ्या मते तरी ते भारतीय साखर उद्योगाच्या चक्रीय स्वरुपातच दडलेले आहे. त्यावर मात करण्यासाठी साखरेचा जादा साठा उभारला जावा व जादा उसाचा वापर साखरेऐवजी इंधन इथेनॉलच्या उत्पादनासाठी करणाऱ्यांना विशेष लाभ देण्यात यावेत, अशा प्रकारच्या काही सूचना साखर उद्योगाकडून देण्यात आलेल्या आहेत. त्या अंमलात आणल्या तर ऊसउत्पादन वाढेल त्या काळात साखर जादा उपलब्ध होणे आणि तिच्या किमती घसरणे टळू शकेल. जेणेकरून ऊसउत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची चांगली किंमतही मिळत राहील व साखर कारखानेही फायद्यात राहातील. या सर्व प्रश्नांची सरकारला जाणीव असून, त्यावरील उपाययोजना लौकरच जाहीर केल्या जातील.

बायोगॅस पासून वीजनिर्मिती आणि मळी व उसाच्या रसापासून इथेनॉलचे उत्पादन या दोन महत्त्वाच्या गोष्टींकडे योग्य लक्ष देऊन साखर कारखान्यांनी आपली स्थिती अधिक भक्कम करावी म्हणून सरकार सातत्याने आवश्यक ती पावले उचलत आहे. उर्जानिर्मिती व इथेनॉल उत्पादनाचे प्रकल्प सुरू करण्यासाठी या कारखान्यांना सुलभतेने कर्जपुरवठा केला जात असून, काही राज्ये अतिशय स्पर्धक दरांत त्यांची वीज खरेदी करीत आहेत, तर काही राज्ये त्यांना प्रदूषण रहित वीजउत्पादनाबद्दल (ग्रीन पॉवर) उत्तेजनपर लाभ देत आहेत. माझ्या माहितीप्रमाणे भारतीय साखर उद्योगाकडे तब्बल सहा हजार मेगॅवॅट वीज उत्पादित करण्याची क्षमता आहे. आज सुधारित तंत्रज्ञान व उच्च दाबाचे बॉयलर्स यांच्यामुळे वीजउत्पादन हा भारतातील साखर कारखान्यांसाठी उत्पन्नवाढीचा एक अतिशय महत्त्वाचा असा स्त्रोत बनला आहे. त्याचा पुरेपूर उपयोग करून घेतला गेला तर ते सर्वांसाठीच फायद्याचे ठरेल.

पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळविण्याच्या उद्योगास भारत सरकार उत्तेजन देऊ इच्छित आहे. त्यामुळे साखर कारखान्यांना अधिक उत्पन्न मिळू शकेल. अर्थात हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी काही निश्चित धोरणे आखली जाणे मात्र जरुरीचे आहे. सध्या आम्ही पेट्रोलमध्ये साधारणतः दहा टक्क्यांपर्यंत इथेनॉल मिसळविण्याचे ठरविले आहे. आत्तापर्यंत इथेनॉलच्या आंतरराज्य वाहतुकीस काही अडचणी होत्या. परंतु आता त्या आम्ही बहुतांशी दूर केल्या आहेत. हा कार्यक्रम नेटाने राबविण्यास सरकार वचनबद्ध असून, त्यासाठी आवश्यक ती सर्व पावले निश्चितपणे टाकली जातील.

देशांतर्गत मागणीची पूर्तता करू शकेल एवढे साखर उत्पादन या २००८-०९ च्या हंगामात झालेले नाही. याची आपणा सर्वांना कल्पना आहे. खरे पाहाता, १ ऑक्टोबर २००८ रोजी सरकारी कोठारांमध्ये सुमारे दहा दशलक्ष टन एवढा समाधानकारक साखर

साठा होता. परंतु २००९-१० च्या हंगामात फक्त १५ दशलक्ष टन साखरेचे उत्पादनच अपेक्षित असून, देशांतर्गत मागणीच्या तुलनेत (२२ दशलक्ष टन) ते पुरेसे ठरणारे नाही. त्यामुळे आता नव्या हंगामाची सुरुवात १ ऑक्टोबर २००९ रोजी होईल तेव्हा सरकारी कोठारांमध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत बराच कमी साखर साठा असेल. ही सर्व परिस्थिती लक्षात घेता देशांतर्गत गरज भागविण्यासाठी सरकारला आता साखर आयात करावी लागण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने गेल्या काही काळात पुढील पावले उचलण्यात आली आहेत :-

१) साखर कारखान्यांकडून आयात केल्या जाणाऱ्या कच्च्या साखरेवरील अबकारीकर (कस्टम ड्युटी) पूर्णपणे रद्द.

२) साखर कारखान्यांप्रमाणे सार्वजनिक क्षेत्रातील विविध संस्थांनाही पांढरी व रिफाइन्ड साखर आयात करण्यास परवानगी. त्यावरील अबकारी करही पूर्णपणे माफ.

३) साठेबाजी व काळ्या बाजारास आळा घालण्यासाठी साठेनिर्बंध जारी. 'टर्नओव्हर'ची मर्यादा निश्चित.

४) उसाचे उत्पादन वाढविण्यासाठी सवलतीच्या दराने कर्जपुरवठा.

५) उसाचे गाळप व कच्च्या साखरेवरील प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या अत्याधुनिक यंत्रसामग्रीसाठी सवलतीच्या दराने कर्जपुरवठा.

या उपाययोजनांमुळे २००९-१० सालात साखरेची उपलब्धता वाढण्यास हातभार लागेल आणि साखरेच्या किमती वाजवी राखणे शक्य होईल, अशी अपेक्षा आहे.

वाजवी किमतीत पुरेसा साखरपुरवठा करण्यास व ऊसउत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाची चांगली किंमत देण्यास माझे सरकार वचनबद्ध आहे. सध्या साखरेच्या किमतीत होत असलेली वाढ ही केवळ तुटवड्यामुळे नाही तर साखरेच्या आंतरराष्ट्रीय किमतीतील तेजीमुळेही आहे. दरम्यान, पावसाने ओढ दिल्यामुळे हा प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे.

अपुऱ्या मोसमी पावसामुळे आपला देश सध्या कठीण परिस्थितीतून जात आहे, हे आपण सर्वजण जाणताच पावसाअभावी केवळ तांदुळासारख्या पिकांच्या पेरण्यांवरच परिणाम झालेला नाही, तर उसाच्या उत्पादकतेवर व साखरेच्या उताऱ्यावरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता पुढील हंगामातच नव्हे तर आगामी वर्षांमध्येही ऊसउत्पादन वाढविण्यासाठी आम्ही साखर





कारखान्यांना सवलतीच्या दराने कर्जे उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करीत आहोत. ऊसउत्पादकता व साखरेचा उतारा वाढविण्यासाठी त्यांनी ही रक्कम ऊसउत्पादक शेतकऱ्यांपर्यंत ४ टक्के व्याजाने पोचवावी, अशी अपेक्षा आहे. २००८-०९ च्या हंगामापेक्षा २००९-१० चा साखर हंगाम चांगला जाईल, अशी आपण आशा करूया. या भाषणाचा समारोप करण्यापूर्वी मी आपल्या लक्षात आणखी एक गोष्ट आणून देऊ इच्छितो. ब्राझीलसह जगातील बहुतेक सर्व साखर उत्पादक देशांच्या तुलनेत भारतातील ऊसउत्पादक शेतकऱ्यांकडे खूपच कमी जमीन आहे. त्यापैकी बहुतेकांच्या शेतीचा आकार जेमतेम एक हेक्टर एवढाच असल्याचे दिसते. त्यामुळे आपल्याकडील साखर कारखान्यांकडे काही वेळा ३०-३० हजार शेतकरी ऊस आणून टाकतात. अन्य देशांतील साखर कारखान्यांकडे मात्र काही शेकडा शेतकऱ्यांकडूनच ऊस येतो.

आपल्या या छोट्या व दुर्बल शेतकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी भारत सरकारने उसाच्या किमान हमी किमती ठरवून दिल्या आहेत. अर्थात शक्य असेल तेथे त्यापेक्षाही जास्त किंमत देण्याची मुभा साखर कारखान्यांना आहे.

अर्थात हे सारे केले जात असले तरी देशातील ऊसउत्पादन कसे वाढवायचे आणि साखरेची देशांतर्गत मागणी पुरी कशी करायची, हा आजही आपल्या सर्वांच्या चिंतेचा विषय आहे. अन्नधान्य व अन्य महत्त्वाच्या पिकांचे उत्पादन वाढविण्याचेही दडपण असल्यामुळे आपण उसाच्या लागवडीचे क्षेत्र तर वाढवू शकत नाही. त्यामुळे आता आपल्यापुढे पुढील दोनच पर्याय उरतात.

१) उसाची उत्पादकता वाढविणे आणि

२) साखरेचा उतारा वाढविण्यासाठी उसाच्या नव्या जाती विकसित करणे.

हे उद्दिष्ट साध्य करायचे तर आपल्याला शेतीचे तंत्र बदलावे लागेल, संशोधनाआधारे बियाणांच्या नव्या जाती विकसित कराव्या लागतील आणि साखर कारखान्यांकडून शेतकऱ्यांना शक्य ती सर्व मदत व सहाय्य द्यावे लागेल. अर्थात हा प्रश्न फार मोठा असून, त्याचा विचार केवळ शेतकरी व साखर उद्योगाकडून नव्हे तर सरकारकडूनही होणे जरुरीचे आहे.

याच प्रकारच्या शिखर परिषदा यापूर्वी दुर्बत घेतल्यानंतर आता नवी दिल्लीत तिचे आयोजन केल्याबद्दल मी आयोजकांचे अभिनंदन करू इच्छितो. या परिषदेत भारत सरकारचे अन्न सचिव, पेट्रोलियम मंत्रालयाचे संयुक्त सचिव, भारतीय साखर उद्योगाचे सन्मान्य प्रतिनिधी आणि इंडियन शुगर मिल्स असोसिएशन व नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑपरेटिव्ह फॅक्टरीजचे पदाधिकारी आदिंची अभ्यासपूर्ण भाषणे होणार आहेत. त्यांच्या विचारमंथनातून आपल्याला भारतीय साखर उद्योग व बाजारपेठेचेच नाही तर एकूण आंतरराष्ट्रीय परिस्थितीचेही उत्तम आकलन होईल, असा मला विश्वास आहे.

●●●



# निळवंडे धरण पूर्णत्वाला नेऊ

## : ना. अजित पवार



*उर्ध्व प्रवरा डावा कालव्यामधील बोगद्याच्या कामाचे भूमीपूजन राज्याचे जलसंपदा मंत्री श्री. अजित पवार यांच्या शुभहस्ते आणि कृषीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या अध्यक्षतेखाली व राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते आमदार मधुकरराव पिचड यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. त्या समारंभाचा हा संक्षिप्त वृत्तांत.*

मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळातंर्गत येणाऱ्या ऊर्ध्व प्रवरा डावा कालवा सा. क्र. ५९०१० मी. ते ६२८२० मी. मधील बोगद्याच्या कामाचे भूमीपूजन राज्याचे जलसंपदा, पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री श्री. अजित पवार यांच्या शुभहस्ते ८ ऑगस्ट, २००९ रोजी निळवंडे (ता. संगमनेर) येथे झाले. समारंभाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे कृषी व जलसंधारणमंत्री बाळासाहेब थोरात होते. या समारंभाला राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते मधुकरराव पिचड, श्री. सुधीर तांबे, श्री. दादा कळमकर, श्री. रावसाहेब म्हस्के, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक प्रफुल्लचंद्र झपके, मुख्य अभियंता म. वि. पाटील व अन्य मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी झालेली प्रमुख नेत्यांची भाषणे पुढीलप्रमाणे :

## अजित पवार, जलसंपदा मंत्री

मित्रांनो, अतिशय महत्वाच्या कामाच्या निमित्ताने मला नगर जिल्ह्यामध्ये येता आले. पिंपळगाव धरणाच्या ४५ कोटी रुपयांच्या कामाचा शुभारंभ केला. अकोला तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी ५ हजार एकरातील पाणी आणि आठ कोल्हापूर टाईप धरणाच्या बंधाऱ्यांना भरून देण्याच्या कामाचा शुभारंभ केला. खूप दिवस पिचडसाहेबांचे तशा प्रकारचे म्हणणे होते. निळवंडेच्या बाबत तर काय बोलायचे, १९७०सालचा हा प्रकल्प, त्यावेळेस मी नेहमी माझ्या आजोळी देवळाली-प्रवराला यायचो. तसं मी लहानपणापासून बघतोय आणि निळवंडे-निळवंडे ऐकतोय. मला कधी आयुष्यात वाटलं नव्हतं की मी या खात्याचा मंत्री होईल आणि निळवंडे पूर्णत्वास नेण्यासाठी मला स्वत:ला मदत करावी लागेल. नेहमीच नगर जिल्ह्यात कोणत्याही कामाकडे एक जवळीकीच्या नात्याने माझ्यासारखा कार्यकर्ता बघत असतो. पुणे जिल्ह्यामध्ये अलिकडे सुबत्ता बघायला मिळत आहे. पण सुरूवातीला महाराष्ट्रामध्ये सुबत्ता कोठे बघायला मिळाली तर ती नगर जिल्ह्यामध्ये. नंतर मात्र पाण्याच्या वेगवेगळ्या प्रकारच्या समस्यांमुळे अडचणी आपल्याला आल्या. पवारसाहेब केंद्रीय संरक्षणमंत्री, सुधारकराव नाईक यांच्या मंत्रीमंडळात मी राज्यमंत्री होतो, पिचडसाहेब मंत्री होते, त्यावेळी पुन्हा याचे भूमिपूजन झाले. त्याच वेळी पिंपळगाव जोगाचेही भूमिपूजन झाले, एकाच दिवशी. पिंपळगाव जोगा जुन्नर तालुक्यात २००० साली आम्ही पूर्ण करून टाकले. आपले निळवंडे चालूच आहे. तुम्हा किती लोकांना माहित आहे की निळवंडेची १९७०ची किंमत आहे ती आठ कोटी रुपये होती आणि आता २००८-०९ ची किंमत फक्त १६०० कोटी रुपये. ७० सालचे आठ कोटीचे धरण आज मी प्रशासकीय मान्यता १६०० कोटी रुपयांची दिली आहे. म्हणून आम्ही नेहमी म्हणतो की काही काही बाबतींमध्ये त्यावेळेस जर अशाप्रकारची धरणे करण्याकरता कर्ज काढून राज्य सरकारने मोकळे केले असते तर चालून गेले असते. पैशाला महत्व कमी होते. आता मात्र वाट्टेल ते झाले तरी चालेल परंतु निळवंड्याचे कालवे, बोगदा आणि धरणाचे राहिलेले काम पूर्ण करायचंच,



**"निळवंडे झाले पाहिजे, अशी मागणी होती. या निळवंड्यावर नगर जिल्ह्यातल्या कितीतरी पुढाऱ्यांनी नको ते राजकारण केले. ज्यांना घेणे ना देणे, पण काही काही लोकांना असे वाटते की एखादा प्रश्न सारखा जिवंत राहायला पाहिजे. त्याशिवाय यांची पोळी भाजली जात नाही. आमचे उलटे आहे, आम्ही एखादा प्रश्न कसा तडीस नेता येईल, एकदा त्या लोकांना आपल्याला मोकळे करता येईल, हा प्रश्न आमचा असतो. मला पिचडसाहेबांनी सांगितले की, अजित निळवंडे धरण करण्याकरता माझ्या स्वत:च्या तालुक्यातील दोन गावे जात आहेत. २ हजार एकर क्षेत्र जातेय. १२ गावे अंशत: त्याठिकाणी बुडीत होत आहेत. मला उपसा सिंचन योजना दिल्या पाहिजेत. आम्ही ताबडतोब त्या मान्य केल्या."**



असा संकल्प आहे. मला राज्य सरकारने ८ हजार कोटी रुपये माझ्या विभागाकरता दिले आहेत. डावा आणि उजव्या कालव्याकरता २१ कोटी रुपयांचा निधी आपण मंजूर केला आहे. धरणाच्या कामाकरता ४२ कोटी रुपयांचा निधी आहे. साधारण सव्वा आठ टीएमसीचे हे धरण आहे. तुम्ही बघितले भंडारदरा धरणाच्या मुळे किती चित्र बदलून गेले. तशाच प्रकारचे चित्र बदलून जाईल. अकोला, कोपरगाव, राहता, संगमनेर, श्रीरामपूर आणि सिन्नर या तालुक्यांचे चित्र बदलून जाणार आहे. धरणाकरता ४२ कोटी आणि कालव्याला २१ कोटी असे ६३ कोटी रुपये दिले आहेत, आणि सीडब्ल्यूसीचा क्लिअरन्स मिळविण्याचे काम चालले आहे. पवारसाहेब केंद्रामध्ये मंत्री आहेत. त्यांच्या शब्दाला तेथे वजन आहे. सोनियाची असतील, डॉ. मनमोहनसिंगजी असतील, पवारसाहेब, विलासराव अशा मान्यवरांची मदत घेऊन सीडब्ल्यूसीचा क्लिअरन्स मिळाला की अधिकचा निधी आणता येईल. आता आम्ही ठरविलं आहे की फक्त राज्य सरकारच्या निधीची वाट पाहायची नाही. दोन-दोन हजार कोटी रुपयांचा निधी केंद्रातून आणायचे काम कधीच आमच्या विभागात झाले नव्हते. त्यात निळवंडेकरताही पैसे टाकता येईल, अशाप्रकारचा प्रयत्न चालला आहे. मित्रांनो, हे सगळे करताना खूप अडचणी आल्या. पहिले पाच वर्षे माझ्याकडे हा विभाग नव्हता. कृष्णा खोरे महामंडळ होते. परंतु, नंतरच्या पाच वर्षात जेव्हा हा विभाग आमच्याकडे आला त्यावेळेस आम्ही पिचडसाहेबांना घेऊन बसायचो. बाळासाहेब वेळोवेळी यायचे. इतर अनेक कार्यकर्ते यायचे. निळवंडे झाले पाहिजे, अशी मागणी होती. या निळवंड्यावर नगर जिल्ह्यातल्या कितीतरी पुढाऱ्यांनी नको ते राजकारण केले. ज्यांना घेणे ना देणे, पण

काही लोकांना असे वाटते की एखादा प्रश्न सारखा जिवंत राहायला पाहिजे. त्याशिवाय यांची पोळी भाजली जात नाही. आमचे उलटे आहे, आम्ही एखादा प्रश्न कसा तडीस नेता येईल, एकदा त्या लोकांना आपल्याला मोकळे करता येईल, हा प्रश्न आमचा असतो. मला पिचडसाहेबांना सांगितले की, अजित निळवंडे धरण करण्याकरता माझ्या स्वत:च्या तालुक्यातील दोन गावे जात आहेत. २ हजार एकर क्षेत्र जातेय. १२ गावे अंशत: त्याठिकाणी बुडीत होत आहेत. मला उपसा सिंचन योजना दिल्या पाहिजेत. आम्ही ताबडतोब त्या मान्य केल्या. त्यांनी मला सांगितले की एक पूल करून द्या. मला वाटले असेल पूल छोटासा, दिला. मला अधिकारी म्हणाले दादा, या पुलाची उंची माहिती आहे का किती? म्हटले किती? याचा एक एक खांब दोनशे फुटांचा आहे. त्याच्यावर स्लॅब. ३५ कोटी रुपयांचा तर पूलच बांधायचे काम चालू आहे. धरणाचे काम ७० साली आठ कोटींचे, एकच पूल आमचा चाललाय ३५ कोटींचा. परंतु, आदिवासी समाजातील लोकांकरता मदत करायची. बाकीच्या भागांत पाणी अडत असताना ज्यांच्या जमीनी गेल्या, घरे दारे जमीन- जुमला गेला त्यांना वाऱ्यावर सोडायचे नाही, ही भूमिका लोकशाही आघाडीच्या सरकारने स्वीकारली. त्याच्यातून ही सगळी कामे मार्गी लावण्याचे काम आम्ही सातत्याने करत आहोत. आजदेखील बोगद्याचे काम सुरू केले. ४५ कोटी रुपयांचा बोगदा आहे. सहाशे क्युसेक्सने त्यातून पाणी जाणार आहे. बाकीचे काही कालवे पूर्णत्वास येत आहेत. त्यासाठी आणखी थांबायची गरज नाही. **तुम्ही येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत लोकशाही आघाडी सरकार येण्यासाठी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वच्या सर्व आमदार निवडून देण्याचे काम करावे. मी आज सांगतो निम्म्या वर्षांतच काम करून दाखवितो. अडीच वर्षांतच पाणी आणून दाखवितो. त्याच्याही आणखी अलिकडे येण्याची तयारी आहे. परंतु, येथे आम्हाला बसवायचे काम करा. भाजप-शिवसेनेच्याने काय होणार? ते पाच वर्षे सत्तेवर होते, काय केले? राज्याला उध्वस्त करण्याचे काम केले. म्हणे रुपयामध्ये झुणका-भाकर, पंचवीस लाख युवकांना नोकऱ्या. आता तर म्हणे शिववडा. वडापावने काय प्रश्न सुटणार आहेत?** आम्हाला वाटते की लोकांना त्यांची कष्टाची भाकरी मिळाली पाहिजे. त्या ठिकाणची भौगोलिक परिस्थिती पाहून मग गहू असेल, ज्वारी असेल, तांदुळ असेल ते त्यांना हक्काने मिळाले पाहिजे. हा प्रयत्न लोकशाही आघाडी सरकारच्या माध्यमातून चालला आहे. सुदैवाने युपीए सरकार दिल्लीत पाच वर्षे सत्तेवर आले आहे. आपण तर भारीच माणसे, एवढी कामे चालली आणि पाडून टाकला आमचा माणूस खासदारकीला. तरी तुमची कामे करतोय. तरीदेखील आज ४५ कोटी रुपयांचे भूमिपूजन चालले आहे. मी मघाशीच पिचडसाहेबांना सांगितले की, माझ्या बारामती मतदारसंघात माझी बहिण निवडून आली, चांगली मते मिळाली. माझ्या एकट्या तालुक्याने किती सुप्रियाला लिड द्यावे? एक लाख पाच हजांचे लिड माझ्या बहिणीला मी दिले. लोकांची कामे





करतोय, कामे करत असल्याने लोक ऐकतात. इथे पिचडसाहेब काम करतात, बाळासाहेब काम करतात तरी तुमचे कोठे तिसरीकडेच चाललेय. हे बरोबर नाही. शेवटी काम करत असताना आम्हाला पण हुरुप केव्हा येतो, ज्यावेळेस आमच्या शब्दाला तुम्ही ओ देता, त्यावेळेस आम्हाला बरे वाटते. मित्रांनो, शाहू-फुले- आंबेडकरांच्या पुरोगामी विचाराच्या महाराष्ट्रामध्ये आपण राहतोय. आपल्याला अजून खूप मोठा पल्ला गाठायचा आहे. अनेक चांगले प्रकारचे निर्णय युपीए सरकारने घेतले आहेत. सहा टक्के दराने तुम्हाला पिककर्ज द्यायला सुरूवात झाली, महिला बचतगटाला चार टक्के व्याजाने कर्जे देण्याचा निर्णय आम्ही घेतला. आता राज्य सरकारनेही त्यात पुढाकार घेऊन २५ हजारांपर्यंत तीन आणि चार टक्याने कर्ज देण्याचा निर्णय झाला आहे. ऊसाचे दर वाढले आहेत. गव्हाचे, तांदळाचे दर आम्ही वाढविले आहेत. तुम्हाला आता टोमॅटोमध्ये चांगला पैसा मिळायला लागला आहे. ज्यांनी भाजीपाला लावला होता त्यांची तर काय चांदीच झाली. शेवटी शेतकऱ्यांना मिळाले पाहिजे. मध्ये आम्ही मंत्रीमंडळामध्ये बसलो, बाळासाहेबांना विचारा, प्रस्ताव होता एक रुपयाच लिटरमागे वाढीचा, आम्ही सगळ्यांनी तेथे लावून धरले. कारण अकोले, संगमनेर, बारामतीला दूध आहे. आम्ही म्हटले रुपया नाही आमच्या शेतकऱ्याला लिटरमागे दोन रुपये वाढले पाहिजेत. एकेकट्या तालुक्याला रोज तीन-चार लाख रुपये जास्तीचे मिळणार आहेत. दहा पैसे संस्थेचे कमीशन वाढविले आणि संघाचे कमीशन चाळीस पैशाने वाढविले. मित्रांनो, शेतकऱ्यांचे प्रतिनिधीत्व करणारे राज्यकर्ते लोकशाही



*प्रफुल्लचंद्र झपके हे जलसंपदा मंत्री अजित पवार यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना.*

आघाडी सरकारमध्ये होते म्हणून तो निर्णय झाला. भाजप-शिवसेनेवाल्यांना नसता घेतला. ते म्हणले असते अरे दूध वाढले तर पुणे-मुंबईला काय होईल? त्यांना काळजी कोणाची तरी पुण्याची आणि मुंबईची. कारण त्यांचे नेतृत्व पुण्या-मुंबईचे आहे. आमचे नेतृत्व ग्रामीण भागातले आहे. आम्ही पुण्या-मुंबईत पण लक्ष देत आहोत. तेथेही घरे बांधून देतोय. तेथेही सुधारणा करतोय. जवारहरलाल नेहरू नॅशनल अर्बन रिन्यूअल मिशनमधून कोट्यवधी रुपयांचा पैसा केंद्र सरकारकडून आणायचे काम चालू आहे. परंतु, त्याचबरोबर खऱ्या अर्थाने आमच्या ग्रामीण भागाचा चेहरा-मोहरा बदलण्याकरता पाटबंधारे, कृषी विभागाचे काम चालू आहे. पवारसाहेबांनी सांगितले की प्रत्येक गावामध्ये शेततळी करा. आता आम्ही अकोल्याकडून संगमनेरला येताना कितीतरी शेततळी पाहिली. साहेब म्हणाले मी दोनशे कोटी रुपये देतो केंद्रसरकारकडून. राज्य सरकार स्वत: दोनशे कोटी रुपये घालत आहे. पाचशे कोटी रुपयांचा शेततळ्यांचा कार्यक्रम आपण राबवितोय. कधी भाजप-शिवसेनेला माहिती आहे का शेततळे कशाला म्हणतात? गावतळे माहित नाही, वनतळे माहित नाही, शेततळे माहित नाही.त्यांना फक्त स्विमींग पूल माहिती आहे पोहायचा. त्याच्याशिवाय त्यांना काही माहित नाही. याचा विचार तुम्ही सर्वसामान्य माणूस कधी करणार आहे का? मित्रांनो, ऐवढ्यापुरतेच आम्ही त्याठिकाणी थांबलो नाही. अनेक महत्वाचे निर्णय आहेत. मंत्रीमंडळात गोरगरीबांना कर्जे देणारी जी महामंडळे आहेत, आण्णाभाऊ साठे असेल, वसंतराव नाईक महामंडळ असेल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर



महामंडळ असेल या सगळ्यांचे अकराशे कोटी रुपयांचे थकीत कर्ज माफ करण्याचे काम केले. शेतकऱ्यांना ज्या वेळी आम्ही मदत करतो, त्यावेळेस ज्याला शेतीवाडी माहिती आहे, जो पूर्वी आपल्या गावाकडे बारा बलुतेदार म्हणून काम करायचा त्याला पण वाऱ्यावर सोडून चालणार नाही, म्हणून तशाप्रकारचा निर्णय घेतला. किंवा आदिवासी समाजकरता शबरी योजनेतील खावटीचे सगळे कर्ज माफ करून टाकले.

आज अशा पध्दतीने मागासवर्गीय समाज, इतर मागासवर्गीय समाज, आदिवासी समाज या सर्व घटकांना बरोबर घेऊन जाण्याचा प्रयत्न केंद्र आणि राज्य सरकार करत आहे. या वेळी तुम्ही पण आमच्या पाठीशी आशिर्वाद आणि ताकद उभी करण्याचे काम मित्रांनो केले पाहिजे हीपण आग्रहाची सुचना या आजच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने उपस्थित असणाऱ्या माझ्या सहकारी मित्रांना करत आहे. मला आठवते, ज्या वेळी राजकारणात नव्हतो, त्यावेळी पहिल्यापासून साहेबांना कोण भेटायला येतोय, काय चाललंय, साहेब चार वेळा मुख्यमंत्री झाले, त्यामुळे सतत घरात राजकारण ऐकायला मिळायचे.

अशाच पध्दतीने एकदा भंडादऱ्याचे पाणी पेटले. म्हटलं पाणी कसं काय पेटलं? कोणीतरी म्हटलं अरे भंडादऱ्याचे पाणी पेटलं. मग म्हटलं पेटलं काय भानगड आहे, तेव्हा कळलं. भंडादरा झालं कोठं, अकोला आणि संगमनेरला. अकोला आणि संगमनेरला काहीच नाही आणि दुसऱ्यांनाच पाणी मिळत होते. त्यानंतर पवारसाहेबांनी निर्णय घेतला की भंडारदऱ्याचे पुन्हा एकदा पाण्याचे फेरवाटप करणार.

पवारसाहेबांनी तो निर्णय घेतल्यावर संगमनेर आणि अकोला या तालुक्यांना पाण्याचा हक्क मिळाला. या तालुक्यांना हक्क मिळाला, माझ्या शेतकऱ्यांना हक्काचे पाणी मिळाले. उपसा सिंचन योजना झाल्या. काही काही जण म्हणायचे हे चोर आहेत, चोर. जे कोणी म्हणायचे ते म्हणोत. मी तर दहा वर्षे पाटबंधारे खात्याचा मंत्री आहे. अधिकारी बसलेत. जर धरणामध्ये पाणी असेल आणि शेतकरी पाणी घेत असेल, तर मी अधिकाऱ्यांना सांगितले की अजिबात शेतकऱ्यांना अडवायचे नाही. काय पाणीपट्टी असेल ती वसूल करा. परंतु, ते पाणी त्या शेतकऱ्याचे आहे. पाणी लोकांना द्यायचे नाही, अशी भूमिका कधी घेतली नाही. पाणी लोकांना दिलेच पाहिजे. तुमच्या येथील उपसा सिंचन योजना नियमित करायचे काम झाले. सर्वांना समान पाणीवाटपाचा कायदा या राज्यामध्ये लोकशाही आघाडी सरकारने केला. नाहीतर वरचा तसाच राहायचा आणि खालचा मजा करायचा. तुमच्या नगर जिल्ह्यात तर पाटबंधारे खाते म्हणजे फार आवडीचे खाते.

पूर्वी कोणाला काय पाहिजे तर नगर जिल्ह्यातील मंडळी म्हणायची पहिले पाटबंधारे खाते. म्हटलं ही काय भानगड आहे? परंतु, आम्ही सगळ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. जेव्हा बाळासाहेब, पिचडसाहेब यांनी सांगितले की तेव्हा त्या भागातील कामे झाली. शेवटी सत्तेवर असताना त्या भागाचा लाल दिवा फक्त फिरण्याकरता सत्ता मिळविली नाही. त्या लाल दिव्याचे तर काही आम्हाला कौतुक नाही. सत्ता येते, सत्ता जाते. ताम्रपट घेऊन जन्माला कोणी आलेले नाही. परंतु, मिळालेल्या सत्तेचा वापर हा सर्वसामान्य माणसाचे प्रश्न सोडविण्यासाठी झाला पाहिजे, ही आदरणीय पवारसाहेबांची आम्हाला शिकवण आहे. त्याकरता आम्ही प्रयत्न करतोय. आता दिल्लीत स्थिर सरकार आले असल्यामुळे त्यांच्या विचाराचेच सरकार उद्याच्या विधानसभा निवडणुकीत आले पाहिजे. म्हणून आज बोगद्याचे काम करताना अनेक एकर क्षेत्र ओलिताखाली आणण्याचे काम झाले आहे. आता केंद्र सरकारलाही कळलं आहे की शेतकऱ्याला वेळोवेळी मदत दिली पाहिजे. आता शेतकऱ्यांचे जे म्हणणे आहे ते ऐकून घेण्याची भूमिका राज्यकर्ते घेत आहेत. ज्याला ज्या व्यवसायाची आवड असेल, त्यांनी तो करायला पाहिजे. जो उद्योग करायचा तो करा, नको त्या धंद्याला लागू नका. चांगल्या सवयी लावा. व्यसनाधिन होऊ नका. दोन पैसे आले तर लोक काहीही सांगतात. आता ऊसाला भाव चांगला मिळणार आहे.म्हणून उगी नको तेथे जायच्या भानगडीत पडू नका. आपली मुले-बाळे प्रपंच डोळ्यासमोर घ्या. चांगल्यातले चांगले दर्जेदार शिक्षण देण्याचा प्रयत्न करा. शिक्षणाच्या चांगल्या संस्था निर्माण करण्याचे काम सरकार करत आहे. दरवर्षी शंभर कॉलेजेस आम्ही द्यायचो. यंदा निर्णय घेतला की १५० कॉलेज आम्ही देऊ. आदिवासी, मागासवर्गीय समाजाकरता क्रांतीकारी निर्णय आम्ही घेतले.नुसती भाषणं करून सगळे बरोबर येत नसतात, तर काहीतरी निर्णय घ्यावे लागतात. तशाप्रकारचे काम लोकशाही आघाडी सरकार करीत आहे. पहिली पाच वर्षे भाजप-शिवसेनेने जी घाण केली होती ती काढण्याकरता वेळ गेला. त्यातून भारनियमन कमी करण्याकरता प्रयत्न केला.

आता घाटघरलाही २५० मेगावॅटचे प्रकल्प सुरू करण्याचे काम सुरू करतोय. परळी, पारस, भुसावळला काम सुरू केले आहे. साखर कारखान्यातून सुध्दा नुसती साखर काढायची नाही तर त्यातूनही विजनिर्मिती करण्यासाठी प्रयत्न आहे. त्यामुळे कोट्यवधी रुपयांचा फायदा राज्यसरकारने शेतकऱ्यांना करून दिला आहे. याअगोदरच्या राज्यकर्त्यांनी अशाप्रकारचे निर्णय कधी घेतले नाहीत. साखरचे ऊसापासून करायची नाही, तर त्यातून इथेनॉल तयार करायचे यासाठी काम करतोय. हे काम चालले असताना आपण मात्र चुकीचे वागू नका. आपण चुकीच्या माणसांच्या पाठीशी राहू नका, ही माझी आपल्याला आग्रहाची विनंती आहे. एवढे मोठे क्षेत्र ओलिताखाली आल्यावर खूप चांगली सुबत्ता बघायला मिळेल. शेवटी तुमच्या- माझ्या भागातील शेतकऱ्यांची कष्ट करण्याची तयारी आहे.काम करण्याची त्याची तयारी आहे. फक्त त्याच्या शिवारात हक्काचे पाणी आणून देण्याचे काम करायचे. आधुनिक पध्दतीने शेती करण्याचा प्रयत्न आहे. मी ज्या पश्चिम महाराष्ट्रातून येतो तेथे डाळिंब, द्राक्षाच्या बागा टँकरवर जगवितात. तुम्हाला हक्काचे पाणी आहे. निळवंडे अशाप्रकारचे धरण आहे की कोठल्याही परिस्थितीत ते भरणारच. निळवंडे भरल्याशिवाय खाली पाणीच जात नाही. आता मृग नक्षत्र कोरडं गेले. धरणे भरलेली नाहीत. त्यामुळे पडणारा थेंबना थेंब अडविला गेला पाहिजे. पाणी जिरवायचे काम करा, माणसाची जिरवायचे बंद करा. पाणी जिरवायचे काम बाळासाहेबांकडे दिले आहे. माझ्याकडे पिण्याचे आणि शेतीचे पाणी आहे. याचा फायदा आपण घेणार आहोत की नाही. म्हणून सगळ्यांना विनंती आहे की निवडणुकीच्या काळात अफवा मोठ्या प्रमाणावर उठविल्या जातात. त्या अफवांवर विश्वास ठेवू नका. मला नगर जिल्ह्याला आजच्या सभेच्या निमित्ताने आवाहन करायचे आहे की नगर जिल्ह्यातील सर्वच्या सर्व जागा राष्ट्रवादी आणि काँग्रेसच्या निवडून द्या. आम्ही मराठवाडा, विदर्भाचा अनुशेष भरून काढला आहे. त्यामुळे आता सर्व भागासाठी निधी वापरता येणार आहे. केंद्र सरकारने ठरविलं आहे की देशाची सिंचनाची सरासरी येण्याकरता जी राज्ये मागे राहिली आहेत, त्यांना निधी मिळू शकतो. उत्तर प्रदेश, बिहार, पंजाब या राज्यांकडे गंगा, यमुना नद्या बारमाही वाहत असल्याने त्यांना पाणी मिळते. नगर जिल्ह्याचे या राज्यात वेगळे काम आहे. सहकारामध्ये राष्ट्रीय पातळीवर काम आहे. आता मात्र काही लोक निव्वळ बेकार सहकारी संस्था चालवित आहेत. काही इतके नालायक लोक आहेत पतसंस्थांमध्ये आहेत. साखर कारखानेही मातीत घालतात. काय करतात कोणाला माहिती? जे पतसंस्था किंवा सहकारी संस्था अडचणीत आणतील त्यांना पुढच्या कोणत्याही निवडणुकीत उभे राहायला बंदी करा. त्यांची लायकीच नाही अजिबात. सहकारी संस्था चालविण्याच्या योग्यतेचे नाहीत. म्हणजे मग हे सगळे दुरुस्त होईल. आम्ही आमच्या भागांमध्ये काम करतोय. तुमच्याही भागातील सहकारी संस्था चांगल्या आहेत. विदर्भात, खान्देशात जिल्हा बँक कोणतीच प्रकरणे करूशकत नाही. आपण आपल्या बँका चांगल्या चालवित आहेत. मध्ये तुमच्या बँकेची



निवडणूक लागली होती. बाळासाहेब म्हणाले, आपण एकत्र येऊ आणि व्यवस्थितपणे निवडणूक लढवू. फक्त सगळ्यांनी एकोप्याने वागायचे. दिवसा एक आणि रात्री एक असे करायचे नाही. सगळी गडबड येथे होते. तसे केल्यामुळेच आपल्या दोन्ही खासदारकीच्या जागा गेल्या. आता मात्र विधानसभेच्या सगळ्या जागा आल्या पाहिजेच. देशामध्ये काँग्रेसला चांगले यश मिळाले म्हणून ते निघून गेले.आता मात्र विधानसभेच्या निवडणुकीत कोठेही कमी पडू नका. पवारसाहेब, देशाच्या राजकारणात गेल्यावर दुसऱ्या फळीकडे वेगवेगळी खाती देण्याचे काम झाले आहे. ते काम चांगल्या पध्दतीने करण्याचा प्रयत्न आहे. आता आम्हाला अनुभवही आला आहे. अनुभवातून माणूस शिकतो. एखादे काम झटक्यात कसे मंजूर करायचे, अधिकाऱ्यांना कसे हाताळायचे. पिचडसाहेबांना विचारा, पिंपळगाव खांडचे काम होणेच शक्य नव्हते. पण ते बसून दिले. येथून पुढे काम करताना कोण कोठल्या जातीचा, पातीचा, नात्याचा, गोत्याचा पाहू नका. हे नाते-गोते नगर जिल्ह्यात फार चालते. काय विचारता सोय नाही. कोण कोठल्या पक्षात असतो, पण नात्याचा म्हटलं की लगेच जवळचा. त्याच्यामुळे काम बिघडतंय. तसं नाही झाले पाहिजे. शेवटी विचारांची बैठक काय या गोष्टीचा विचार केला पाहिजे, अशी माझी सगळ्यांना आग्रहाची विनंती आहे. आजच्या कामाला निधी कमी पडला म्हणून काम बंद पडलंय असं कधी होणार नाही. लवकरात लवकर पाणी अडले पाहिजे, यासाठी प्रयत्न करणार आहे.

## बाळासाहेब थोरात, (कृषी मंत्री) :

आज आपण एक चांगल्या कामाचा शुभारंभ येथे केलेला आहे. निळवंडे धरणाच्या डाव्या कालव्याच्या बोगद्याचे काम जो चार किलोमीटर लांबीचा आहे, ४५ कोटी रुपये खर्चाचा आहे, जवळपास ६०० क्युसेक्स पाणी वाहून नेणारा आहे. या कामाला एक वेगळा अर्थ आहे. तो अर्थ असा की आपल्या सगळ्यांच्या दृष्टीने महत्वाचा जो धरणाचा टप्पा आहे तो आता सुरू होत आहे. निळवंडे धरणाच्या संदर्भातील चर्चा पिढ्यानपिढ्या आपण करत आलो आहे. भंडारदरा धरण निर्माण झाले आणि त्याने एका विभागात समृध्दी निर्माण करण्याचे काम केले. परंतु, हा अवर्षण पट्टा, पर्जन्याछायेचा भाग आहे, ३०० मिलीमीटर पाऊस पडला तरी खूप पाऊस पडला असे समजण्याची वेळ आमच्यावर येत असते. असा हा अवर्षणप्रवण उत्तर नगर जिल्ह्याचा भाग त्याचे परिवर्तन चांगल्या पध्दतीने करायचे असेल, जिरायती भागातल्या शेतकऱ्यात समृध्दी आणायची असेल तर निळवंडे धरण झाले पाहिजे हा आग्रह येथील जनतेचा आणि नेतेमंडळींचा राहिला आहे. अनेक आंदोलने यासाठी झाली. ति. भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली आंदोलने झाली. एक परिषदसुध्दा येथे घेण्यात आली होत. परंतु, धरणाच्या कामाला गती येत नव्हती. जागेच्या संदर्भातील चर्चा सुरू होती. शेवटी प्रत्येक निवडणूक आली की नुसती चर्चा व्हायची, भाषणे व्हायची. मोर्चे चालू असायचे आणि लोक म्हणायचे आता हे फक्त



निवडणुकीपुरतं बोलतात अशा प्रकारची परिस्थिती आहे. लोकांचा विश्वास उडाला होता. हे फक्त आपल्याला फसवतात अशी भावना निर्माण झाली होती. १९८५ साली मी आमदार झालो. त्यावेळी एक चळवळ चालू होती पाण्याचे पुन्हा वाटप करण्याची. त्या पाण्याच्या चळवळीत निळवंडे धरण झाले पाहिजे म्हणून माझी निवड करण्यात आली. धरण झाले पाहिजे हा आग्रह होता. शेवटी १९९२ साली या धरणाचे भूमिपूजन केले त्यावेळेस संरक्षणमंत्री शरद पवार होते आणि मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक होते. काम सुरू करण्याची परिस्थिती निर्माण झाली. काम सुरू झाले, पायाच्या कामाला सुरूवात झाली पण मधला काळ पुन्हा वाईट गेला. फक्त घोषणा, इतके कोटी दिले, तितके कोटी दिले. यामध्ये ९९ साल उजाडले आणि मग मंत्री म्हणून काम करण्याची मला संधी मिळाली. डॉ. पदमसिंह पाटील मंत्री आणि मी राज्यमंत्री होतो. त्यावेळी लोकशाही आघाडी सरकार आले होते. पिचडसाहेबांचे लक्ष होते. ९९ नंतर कामाला गती आली. तेव्हा ते काम सुरू झाले. यामध्ये अडथळे आले नाहीत असे नाही. अनेक प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न होते. आम्हाला असे वाटायला लागले की धरण होत नाही.परंतु, सततच्या प्रयत्नाने या सगळ्या कामांमध्ये यश येत गेले.सगळ्यात महत्वाची गोष्ट कोणती ठरली असेल तर या धरणाचे पुनर्वसन आम्हाला करायचे आहे. प्रकल्पग्रस्तांना वाऱ्यावर सोडणार नाही. ऐवढे मोठे पुनर्वसन करताना जाणीवपूर्वक काम केले. ५ एकर जमीन मी दिली. भूमिहिन होण्याची परिस्थिती अनेक शेतकऱ्यांवर येणार होती. पिचडसाहेबांनी आणि आम्ही एक प्रस्ताव तयार केला. ज्या नदीकाठच्या जमीनी २-३ तालुक्यांत आहेत, ज्या सरकारी जमीनी, गायराने आहेत ते देण्याचा प्रस्ताव होता. त्या प्रस्तावाला अत्यंत चांगल्या पध्दतीचा प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्रातल्या लोकशाही आघाडी सरकारने हा प्रस्ताव मान्य केला. संपूर्ण मंत्रीमंडळाने मान्यता दिली. त्या जमीनी यांत्रिकीकरणाने सपाट करून धरणग्रस्तांना दिल्या. खूप चांगले पुनर्वसन झाले. कोणत्याही शेतकऱ्याच्या जमीनीला धक्का न लागता या शेतकऱ्यांचे पुनर्वसन केले. त्यांना सगळ्या प्रकारची मदत केली. संगमनेरला आम्ही प्रकल्पग्रस्तांच्या बैठका घेतल्या. शेकडो प्रकल्पग्रस्त आमच्यासमोर असे बसलेले असायचे. पिचडसाहेब एक-एक नाव पुकारायचे. त्याची अडचण, अधिकाऱ्यांशी चर्चा व्हायची. सर्व प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन एकदम आदर्श झाले असे समजण्याचे कारण नाही. पण चांगल्या पध्दतीने पुनर्वसन झाले. त्याला निळवंडे पॅटर्न म्हणून ओळखला जातो. हे सगळे प्रश्न खास बाब म्हणून सोडवित गेलो. हे सगळे सोडविताना जलसंपदा विभाग म्हणून आभार मानायचे आहेत ते अजित पवार यांचे. कोठेतरी एका ठिकाणी काम अडले की ते पुढे जात नाही. परंतु, आम्हाला सगळ्यांचे सहकार्य मिळाले. त्यामुळे आदर्श असा निळवंडे प्रकल्प पूर्ण झाला. शेतकऱ्यांचे आणखी काही प्रश्न आहेत, ते आपल्याला सोडवावे लागतील. आज तीन टीएमसी पाणी अडलेले आहे. पुढच्या वर्षी पाच टीएमसी पाणी अडेल. त्यानंतर नऊ टीएमसीचे धरण दोन वर्षांत पूर्ण होणार आहे. पुढच्या पिढ्यांपिढ्याकरता हे एक मोठे पाऊल आहे. भंडारदरा धरणाप्रमाणेच निळवंडेमुळे जिरायती भागातील शेतकऱ्यांचे जीवन समृध्द होणार आहे. निळवंडेचे नऊ आणि भंडारदऱ्याचे अकरा असे वीस टीएमसी पाणी आपल्याला मिळणार आहे. २० टीएमसी पाणी याचा अर्थ संपूर्ण उत्तर नगर जिल्ह्यामध्ये कोणीही पाण्यापासून वंचित राहणार नाही, इतकी ताकद निळवंडेच्या पाण्यात आहे. काटकसरीने, ठिबकच्या सहाय्याने आपण वापर केला तर संपूर्ण जिल्हा समृध्द होईल. हे काम पुढच्या काळात आपल्याला

करायचे आहे. उजवा जो कॅनॉल आहे त्याचे ६५ टक्के काम आणि डाव्या कालव्याचे ५० टक्के काम पूर्ण केले आहे. याची गती आणखी जास्त राहावी अशी आपली अपेक्षा आहे. अजितदादांनी एक चांगली गोष्ट केली की निळवंडे धरणाला एआयबीपीमधून पैसे मिळावेत म्हणून केंद्राकडे प्रस्ताव पाठविला. धरण पूर्णत्वाला जात असताना केंद्र सरकार त्याला मदत करत असते. तो पैसा मिळाल्यानंतर कालव्याचे काम लवकर पूर्ण होईल. काही मंडळी काही गैरसमज पसरविण्याचा प्रयत्न करतात, माझे मत असे आहे की काळजीपूर्वक वापर केला तर २० टीएमसी पाणी सगळ्यांना पुरू शकते. निळवंडेचे पाणी येत्या पाच वर्षांत सगळीकडे फिरले पाहिजे. अजितदादांची काम करण्याची पध्दत मी पाहिली आहे. एखादा विरोधी पक्षाचा जरी आमदार आला आणि पाण्याचे काम असेल तर त्याला ते नाही म्हणत नाहीत. मला निश्चित खात्री आहे की विलासराव देशमुख यांनी मदत केली आहे. मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचे सहकार्य लाभत आहे. आजचा सत्कार हा ऋण व्यक्त करण्याचा सुध्दा सत्कार आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. पिचडसाहेब, अजित पवार यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचा सत्कार आहे. पाणी आले आहे त्याचे पूजन आणि तुमच्या सगळ्यांचा सत्कार करण्याची संधी आम्हाला मिळावी अशी आमची अपेक्षा आहे. लोकशाही म्हटली की निवडणुका असतात. आपण काम करणाऱ्या माणसांच्या पाठीशी उभं राहण्याची जबाबदारी घेतली पाहिजे. आपण ही काळजी घेतली नाही तर विकासाला खिळ बसू शकते, हे आपल्याला माहित आहे. दुर्दैवाने लोकसभेच्या निवडणुकीत जे घडलं ते काही आपल्याला शोभा देणारे नव्हते. आम्ही लोकशाही आघाडी सरकार म्हणून काम करताना जे घडलं त्याच्या कारणमिमांसेत जाण्याचे कारण नव्हते. त्यामध्ये स्पष्ट होते की आम्ही सगळे जर तुमचे काम करत आहोत तर बाकी वेगळा विचार करण्याची गरज नाही. भक्कमपणे पाठीशी उभं राहण्याचाच विचार आपण ठेवायला हवा होता. दुर्दैवाने वेगळा विचार केला गेला. याचे वाईट वाटल्याशिवाय राहत नाही. येथून पुढच्या काळात काळजीपूर्वक वाटचाल करावी लागेल. पुढच्या पाच वर्षांत पाणी पाहिजे असेल तर लोकशाही आघाडी सरकार यावेच लागेल.हे सरकार आल्याशिवाय पाणी देता येणे शक्य होणार नाही. आश्वासने आणि खोट्या गोष्टी आपण युतीच्या काळात पाहिल्या आहेत. ही वाटचाल आपल्याला आणखी समृध्दीकडे नेण्यासाठी करावी लागेल.

## मधुकर पिचड, आमदार :

आज खऱ्या अर्थाने आपल्या जिल्ह्यात अजित पवार यांच्या हस्ते वचनपूर्तीचे कार्यक्रम झाले. मुळा नदीवर मोठे धरण झाले. निळवंडेला फार मोठा इतिहास आहे. ही निळवंडेची साईट निवडताना मी एक कार्यकर्ता आहे. आण्णासाहेब शिंदे त्या वेळी नियोजन मंडळात होते. त्यांनी मला बोलावून सांगितले की, मधुकर निळवंडे जर आपण पूर्ण करू शकलो नाही तर आपल्या पिंडाला कावळा शिवणार नाही. भाऊसाहेब थोरातांनी प्रयत्न केले. पवारसाहेबांनी प्रयत्न केले. पुनर्वसनाचा प्रश्न होता. तो सोडविण्याचे काम केले. महाराष्ट्रात कोठेही झाला नाही असा निर्णय घेऊन निळवंडेचे पुनर्वसन झाले. निळवंडेत ३ टीएमसी पाणी साठविले आहे. अजुनही पाणी साठवायचे आहे. पुनर्वसन करताना किती चांगला दृष्टिकोन ठेवावा, यासाठी अजित पवार यांच्यासारखे दुसरे उदाहरण नाही. ते जागेवर निर्णय देतात.हो


*आमदार मधुकर पिचड यांचे मुख्य अभियंता म. वि. पाटील हे पुष्पहार घालून स्वागत करताना.*

असेल तर हो, नाही असेल तर नाही. निळवंडेच्या धरणग्रस्तांसाठी लिफ्ट मागितल्या. ३५ कोटीच्या सहा लिफ्ट अजित पवार यांनी मंजूर करून दिल्या. आज त्याचे काम चालू आहे. ज्याला पाहायचे असेल त्याने पाहावे. विहिरी तयार झाल्या आहेत. धरणावर ३५ कोटी रुपयांच्या पुलाचे काम चालू आहे. पुनर्वसनाचे प्रश्न सोडविताना घरचे प्रश्न आहेत या भावनेतून त्यांनी सोडविले. बाळासाहेब थोरात आणि मी असे या प्रश्नात लक्ष घालून जाणीवपूर्वक काम करत असतो. आपल्या सगळ्यांची अपेक्षा आहे की पाणी मिळावे. काही लोकांची इच्छा आहे की निळवंडे बिन कॅनॉलचे व्हावे. पण आपल्याला ते होऊ द्यायचे नाही. आपल्याला ते कॅनलसहित करायचे कारण त्यात सगळ्या लोकांचा फायदा आहे. इतकं मोठं धरण आपण केलं. काय मागितले? तर निळवंडेच्या वरच्या भागात जे लोक राहतात त्यांच्या शेतीला पाणी उचलून द्या. ज्यांना अनेक वर्षांची दु:खे आहेत. या विभागात अनेक प्रश्न आहेत. दुष्काळात असणारे लोक आहेत. त्या लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी हा प्रकल्प पूर्ण करण्याचे काम करायचे आहे. आज अजित पवार यांच्या हस्ते या कामाचा शुभारंभ होतो आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली हे काम करायचे आहे. पण हे पूर्ण करणे अजित पवार, बाळासाहेब आणि माझ्या हातात नाही. जर निळवंडेचे सगळे पाणी अडवायचे असेल तर ते तुमच्या हातात आहे. तुम्ही परत जर आमचं सरकार आणलं तर हे धरण पूर्ण होईल. त्यासाठी आपल्याला त्या कामाला लागायचं आणि त्यासाठी आपल्या ज्या अपेक्षा आहेत त्या पूर्ण करूयात. निळवंडेचे पाणी सगळ्या उपेक्षित विभागाला द्यायचे अभिवचन आज अजित पवार यांच्या वतीने देतो. अजित पवार यांनाही मी शब्द देतो की आपल्या विचाराचे सरकार मुंबईला आणायचे आहे. त्या सरकारमध्ये तुम्ही असायला हवेत आणि तुमच्याच हस्ते पाणी आम्हाला मिळायला हवे हा जनतेचा आग्रह आहे. तो पूर्ण करूयात अशीच इच्छा व्यक्त करून माझे भाषण संपवितो.

●●●

